अहम् आवाम्

वर्ष पहिले | अंक ३ | ऑगस्ट २०१३

कल्पक, चौकस
किशोरांचे मासिक

# वयम्

आपण सारे






566773 ला 'CITY' एसएमएस करा, उदा. 'Mumbai', आताच!

विमा आग्रहाची विषयवस्तू आहे. विक्री व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी कृपया सेल्स ब्रोशर काळजीपूर्वक वाचा.

एलआयसी ची

# जीवन अंकुर

नॉन-लिंक्ड जीवन विमा प्लॅन

- मुदतपूर्तीला 'सम ॲश्युअर्ड' आणि लॉयल्टी ॲडिशन* देय
- ज्याच्या जीवनाचा विमा उतरवला त्याचे अकाली निधन झाल्यास पुढील रकमा मिळतील:
  क) एक सम ॲश्युअर्ड तात्काळ
  ख) मुदतपूर्तीपर्यंत सम ॲश्युअर्डच्या 10% प्रति वर्ष
  ग) मुदतीच्या अखेरीस 'मॅच्युरिटी बेनिफिट्स' (सम ॲश्युअर्ड आणि लॉयल्टी ॲडिशन्स*)
- ॲक्सिडेंट बेनिफिट आणि क्रिटिकल इलनेस रायडर पर्याय उपलब्ध
- पालकांच्या जीवनावर, मुलाला लाभार्थी करुन जोखमीसाठी विमाछत्र
- **एकदाच, एक रकमी हप्त्याचा पर्याय देखील उपलब्ध**

तुमच्या मुलाच्या भवितव्याची खात्री बाळगा, पूर्णपणे.

LIC
भारतीय आयुर्विमा महामंडळ
www.licindia.in

*कॉर्पोरेशनच्या अनुभवावर अवलंबून

RNI No.MAHMUL03122/13/1/2013-TC

अहम् आवाम्

# वयम्

आपणा सारे

कल्पक, चौकस
किशोरांचे मासिक

वर्ष १ | अंक ३ | ऑगस्ट २०१३

**प्रकाशक**
श्रीकांत बापट

**सल्लागार**
कुमार केतकर
अच्युत गोडबोले
श्रीकांत वाड
डॉ.उदय निरगुडकर

**मुख्य संपादक**
शुभदा चौकर

**कला दिग्दर्शक**
अच्युत पालव

**उपसंपादक**
क्रांती गोडबोले

**मांडणी-सजावट साहाय्यक**
धनंजय कोकाटे

**मुद्रितशोधन**
शकुंतला मुळ्ये

**मार्केटिंग सल्लागार**
विनायक प्रभू

**वितरण सल्लागार**
नरेंद्र रावराणे

'वयम्' हे मासिक मालक, प्रकाशक श्रीकांत बापट यांनी इंडिगो प्रेस (इंडिया) प्रा.लि.,प्लॉट नंबर-१सी/७१६, ऑपोझिट दादोजी कोंडदेव क्रॉस रोड, भायखळा (पू) ४०००२७ येथे छापून, १०१, नंद चेंबर्स, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२ येथे प्रसिद्ध केले. या अंकातील सर्व मतांशी संपादक सहमत आहेत असे नाही. सर्व हक्क प्रकाशकाधीन.

**संपादकीय विभाग :**
'वयम्' न्यू वंदना को.ऑप.हा.सो., ३रा मजला, लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ ठाणे- ४००६०२.
दूरध्वनी : २५९८६२०२
इमेल : info@wayam.in

वेबसाइट : www.wayam.in







# अंतरंग

संपादकीय- ४
आकाशातली रंगपंचमी- ६
ढगांचे रौद्ररूप- १०
श्रावण-काव्य- १३
ढगॉलॉजी- १४
श्रावण साखळी- १७
आम्हांला वाचवा- १९
सापांना अभय देणारा 'मित्र'- २०
कल्पककला- २५
शोधाशोध- २६
अच्युत गोडबोले यांच्याशी संवाद- २८
मनमोहक कास पठार- ३०
Gumbow & Hand-shakes- ३४
बुकमार्क्स- ३७
गोष्ट मार्क इंग्लिसची / छोटा शेफ- ३८
जीनियस अशोक- ४०
कोडी / शब्दाशब्दी- ४५
दुकानदारीचा अनुभव- ४६
विनोद / चित्र रंगवा- ४९

## आभार आणि आनंद!
## विचार-स्पर्धेला तुफानी प्रतिसाद!!

'मला .....पासून स्वातंत्र्य हवे आहे.....' आणि '....... ही माझी जबाबदारी आहे, असे मला वाटते.' अशी दोन वाक्ये आम्ही तुम्हांला दिली होती आणि त्याखाली प्रत्येकी ५-१० वाक्यांत तुमचे विचार लिहून आम्हांला पाठवा, असे आम्ही म्हटले होते. या विचार-स्पर्धेला तुम्ही मुलांनी तुफानी प्रतिसाद दिला आहे. किती माहितीये ? -सुमारे १२,०००! महाराष्ट्रभरातून सुमारे १२,००० मुलांनी त्यांचे विचार आमच्याकडे पाठवले आहेत. आम्ही हा प्रतिसाद बघून खूपच आनंदित झालो आहोत. तुमच्या सर्वांचे लेखन वाचायला आता आम्हांला जरा वेळ द्याल ना! आम्ही वाचण्याचे काम सुरू केले आहे. निवडीचे काम अत्यंत कठीण झाले आहे. पुढच्या महिन्यात आम्ही निकाल जाहीर करू.

## संपादकीय

# मेघांत अडकलेली किरणे सोडवूया!

**लहानपणी** ढगांकडे बघताना मला नेहमी वाटायचं की, आपल्याला ढगांना हात लावता आला पाहिजे. म्हणून मला विमान प्रवासाचं खूप आकर्षण होतं. लहानपणी विमान प्रवास सहजशक्य नव्हता. मोठेपणी विमान प्रवास आवाक्यात आला. आतापर्यंत कितीतरी विमान प्रवास झाले, पण तरी विमानात खिडकीची जागा मिळावी यासाठी मी आजही प्रयत्न करते. विमानाच्या खिडकीतून ढगांकडे पाहायला खूप मजा येते. एरवी आपण ढग खालून बघतो. विमानातून मात्र ढगांची वरची बाजू दिसते. काही वेळा ढगांची गर्दी असली की, विमानातून खाली पाहताच एक मोठी पांढरीधोप दुलई अंथरल्यासारखी वाटते. आणि त्या ढगांच्या दुलईवर आपल्याच विमानाची सावली पडलेली बघताना तर फार मजा येते. काही वेळा ही दुलई इतकी दाट असते की, त्यातून नजर अजिबात खाली पोहोचत नाही. खालती भूभाग आहे की जलाशय, हेही समजू शकत नाही. कधी ढगांचे पुंजके दिसतात. कधी काळे-पांढरे ढग तर कधी रुपेरी- सोनेरी, तर कधी रंगीत. अशी ही निसर्गातली रंगपंचमी न्याहाळण्यासाठी सध्या श्रावणातले ढग नक्की बघा. श्रावणात एकूणच निसर्ग फार मोहक दिसतो. पावसाने धुऊन काढलेली झाडं, चकचकीत पानं, सुखद हिरवाई, सानुली रानफुलं, ढगांचे रंग, अधूनमधून दिसणारं इंद्रधनुष्य... अशा या श्रावणातल्या विभ्रमांमागचं विज्ञान उलगडून दाखवणारे काही लेख, तुम्हांला या 'वयम्'मध्ये वाचायला मिळतील.

ढगांच्या रंगपंचमीचा आणि आकारांचा उत्सव साजरा करत असताना, आपण ढगांचं रौद्ररूप विसरू शकत नाही. जूनमध्ये उत्तराखंडमध्ये ढगफुटी झाली. हजारो माणसे मृत्युमुखी पडली.

अपार नुकसान झालं. ढग इतके क्रूर का झाले, हेही आपण समजून घेणार आहोत. निसर्गाच्या साखळीत जसा प्रत्येक जीव महत्त्वाचा, तशीच प्रत्येक जिवाची जबाबदारी मोठी आहे.

श्रावण हा सणांचा राजा. बरेचसे श्रावणसण निसर्गाशी निगडित आहेत. मला आठवतं, लहानपणी आम्ही श्रावणात पत्री जमा करायचो. बेल, तुळस, दूर्वा, शमी, आघाडा, पारिजातक अशा काही वनस्पतींची पानं जमा करायचो. ही पानं पूजेला लागायची. आजच्या शहरी आधुनिक जीवनात त्या परंपरा मागे पडल्या आहेत. पण आता जाणवतं की, या परंपरांचे जनक किती विज्ञाननिष्ठ आणि कल्पक होते! या सर्व वनस्पतींमध्ये औषधी गुणधर्म असतात. शिवाय श्रावणात या वनस्पती जोमाने वाढतात, म्हणून या महिन्यांत त्यांचे शेंडे खुडण्याची प्रथा! पूर्वीच्या काळात प्रसारमाध्यमं नव्हती. तेव्हा अशा महत्त्वाच्या माहितीचा प्रसार करण्यासाठी अशा व्रतवैकल्यांच्या प्रथा पाडल्या गेल्या असाव्यात. आज आपल्या घरी या प्रथा पाळल्या जात असोत वा नसोत, पण निसर्गाविषयी कृतज्ञता बाळगण्याला पर्याय नाही, हा धडा आपण उत्तराखंडासारख्या घटनांतून शिकला पाहिजे.

आजच्या आणि कालच्या पिढीने केलेल्या चुका तुमची पुढची पिढी करणार नाही, अशी आशा आम्हांला वाटते. कारण तुमची पिढी स्वत:च्या मनाने निर्णय घेणारी आहे. तुम्हा मुलांना तुमच्या आई-वडिलांनी लहानपणापासून 'चॉइस' करण्याचे स्वातंत्र्य दिलंय. त्यातून तुम्ही निवड करायला शिकलात. तुम्हांला काय हवं, कसं हवं, हे तुम्ही ठरवू शकता. तुमचे कपडे, खेळ, खाऊ, करमणूक यांबद्दल तुम्ही तुमची आग्रही मतं मांडता. काय वापरायचं, कसं वापरायचं, कसं वागायचं, काय टाळायचं अशा मूलभूत गोष्टींबाबत तुम्ही आग्रह धरला पाहिजे. कचरा इथेतिथे न टाकणं, प्लास्टिकच्या पिशव्या कमीत कमी वापरणं, पाणी जपून वापरणं, पावसाचं पाणी साठवणं अशा काही गोष्टींबाबतही तुम्ही आग्रही राहाल ना? पुढच्या काळात 'श्रावणमासी हर्ष मानसी' असं आनंदी श्रावणगीत म्हणत जगायचं की 'श्रावणमासी खेद मनासी' असं कण्हत जगायचं, हे आपल्या आजच्या जगण्याच्या चॉइसवरून ठरणार आहे.

गेल्या महिन्याच्या 'वयम्'मध्ये आम्ही तुमच्यासाठी विचार-स्पर्धा जाहीर केली होती. त्या स्पर्धेला भरघोस प्रतिसाद मिळाला आहे. काही हजार जणांनी त्यांचे विचार पाठवले आहेत. तुमचे विचार वाचताना आम्ही भारावून गेलो आहोत. त्यात तुम्ही तुमच्या स्वातंत्र्याच्या कल्पना स्पष्टपणे मांडल्या आहेत, शिवाय तुम्हांला तुमच्या जबाबदारीचं भान आहे, हेही तुमच्या लिखाणातून जाणवतंय. स्वातंत्र्य आणि जबाबदारी दोहोंबाबत स्वत:चा पक्का चॉइस व जाणीव असलेली मुलं बघताना वाटलं- 'तू नव्या जगाची आशा!'

१५ ऑगस्टला स्वातंत्र्यदिन साजरा होत असताना या गाण्याचे शब्द सार्थ ठरोत, यासाठी आपण सर्वजण एकमेकांना शुभेच्छा देऊ या. कारण सध्या नकारात्मक बातम्यांचे आणि गोंधळाचे ढग खूप दाटून आले आहेत. पण तुमचे विचार आणि बुद्धी या काळ्या ढगांना भेदून त्यातून उजेडाची किरणं पसरवणार आहेत. तुम्हांला माहितीये ना, आपले विचार आणि बुद्धी हीच आपली मोठी शक्ती आहे. मोठं होत जाऊ तशी ती कमावत राहूया.

**-शुभदा चौकर**
*info@wayam.in*

# आकाशातील रंगपंचमी

ढगांचा रंग नेमका कसा असतो?
पिंजलेल्या कापसासारखा पांढरा,
हत्तीसारखा काळा, की आता श्रावणात
दिसतो तसा रंगीबेरंगी?



**“नमस्कार ढग्गोबाई”**

“चुकलास. मी ढग्गोबाई नाही, ढगोबा आहे. तू बहुतेक त्या ‘अग्गोबाई ढग्गोबाई’ या गाण्यात गुंतून पडलेला दिसतो आहेस.”

“माफ करा, ढगोबा. चूक झाली, पण ती तुमच्या या दिसण्यामुळं. परवाच आजीनं सांगितलेल्या त्या हिडिंबा राक्षसिणीसारखे तुम्ही दिसलात, म्हणून तोंडातून चुकून ते निघून गेलं.”

“अरे वेड्या, माझ्या दिसण्यावर काय जातोस? माझी तशी काही एकच एक प्रतिमा नाही. तुमच्या त्या मेघदूत लिहिणाऱ्या कालिदासाला आषाढातलं माझं रूप हत्तीसारखं वाटलं होतं. तुम्हीही कधी हा खेळ खेळतच असाल; आकाशातलं माझं रूप कसं दिसतं याचा खेळ. मी आता तुला हिडिंबेसारखा वाटलो काय?”

“नाही, नाही, ढगोबा, चुकलंच माझं.”

''अरे, असा घाबरू नकोस. मी काही तुझ्या अंगावर धावून येणार नव्हतो. मला एवढंच म्हणायचं होतं की, थोडा वेळ थांबलास तर मी एखाद्या ससुल्यासारखा दिसेन तुला. ससा तो ससा की कापूस जसा! अगदी पिंजलेल्या पांढऱ्याशुभ्र कापसासारखा दिसेन मी तुला.''

''बरं सांगितलंत ढगोबा. तुम्ही तुमचा रंग पिंजलेल्या कापसासारखा पांढराशुभ्र असतो असं म्हणालात. पण तेही तितकंसं खरं नाही. त्या कालिदासालाही आषाढातले तुम्ही हत्तीसारखे वाटला होतात. त्याला कारण तुमचा फक्त आकारच नव्हता, तर रंगही होता... हत्तीसारखाच काळा काळा.''

''खरं सांगू? मी ना निराकारच आहे, रंगहीन आहे. गंधहीन आहे. अरे, मी म्हणजे काय, तर केवळ पाण्याची वाफ. आता सांगा, पाण्याला आकार, रंग, वास असतो का? आणि पाण्याची वाफ होताना तर तू घरातही पाहतोस, आई पिण्याचं पाणी उकळते तेव्हा. ती वाफ तर तशी नीटशी दिसतही नाही तुला. प्रेशर कुकरमधून शिट्टी वाजवत ती जेव्हा जोरानं बाहेर पडते तेव्हा दिसते. पण एरवी दिसत नाही. बाहेर अंगणात वाळत घातलेल्या कपड्यातलं पाणी असंच वाफ होऊन उडून जातं तेव्हा ती वाफ दिसते तुला?''

''नाही बुवा. पण मग आता तुम्ही दिसता कसे मला?''

''तू मला दिसतोस तसाच. कोणतीही वस्तू आपण कशी काय पाहू शकतो? तर तिच्यावर पडणारे प्रकाशकिरण ती वस्तू परावर्तित करते, म्हणजे परत पाठवते. ते किरण आपल्या डोळ्यांवर पडतात, आत शिरतात आणि डोळ्याच्या पडद्यावर मग त्या वस्तूची प्रतिमा उमटते. दिवसा सूर्याच्या प्रकाशाचे किरण आणि रात्री दिव्याच्या, कंदिलाच्या, पणतीच्या प्रकाशाचे किरण.''

''पण समजा, तुम्ही ते किरण परत पाठवलेच नाहीत, आपल्यापाशीच धरून ठेवलेत किंवा ते तुमच्या आरपार निघून गेले तर?''

''आरपार निघून गेले तर मी तुला दिसणारच नाही. दरवाज्याची काच जर अतिशय स्वच्छ असेल तर असं होतं आणि मग तू जाऊन त्या काचेवर डोकं आपटून घेतोस, खरं ना?''

''अगदी खरं. परवाच तर आपटलो होतो. अजूनही डोक्यावर टेंगुळ आहे. हे काय!''

''आणि माझा रंग कापूस जसा कसा, हेही विचारत होतास ना? त्याचं कारणही सूर्याच्या प्रकाशातच दडलेलं आहे. आता मला सांग, सूर्याचा प्रकाश कोणत्या रंगांचा असतो?''

''सात रंगांचा, ता ना पि हि नि पा जा. म्हणजेच इंग्रजीत VIBGYOR''

''शाब्बास! मी काय करतो, हे सातही रंग सारखेच परावर्तित करतो. सर्व दिशांनी ते माझ्यावर कोसळत असतात. मीही सर्व दिशांनी ते परावर्तित करून टाकतो. पण सूर्यप्रकाशात जरी सात रंग असले तरी ते वेगवेगळे दिसतात का तुला?''

''त्यासाठी ते लोलकातून किंवा पाण्याच्या थेंबातून जावे लागतात ना?''

''हो ना. म्हणूनच सूर्यप्रकाश पांढराच दिसतो.''

''झालं तर! म्हणूनच मग माझा रंगही पांढरा.''

''पण मग त्या कालिदासाला तुम्ही काळे कसे दिसलात?''

''हुशार आहेस! वाटलंच होतं मला तू हे विचारणार असं. अरे, आता मी असा पिंजलेल्या कापसासारखा विरळ विरळ दिसतो, कारण माझ्या अंगात फारशी वाफ नाही. फारसं बाष्प नाही. पण

आषाढात मान्सूनचे वारे येतात. ते आपल्याबरोबर भरपूर बाष्प घेऊन येतात. ते सगळं माझ्या अंगात भिनतं. बाष्पाची दाटीवाटी होते. त्यामुळं अंगावर पडलेले प्रकाशकिरण तिथंच अडकून पडतात. त्यांचं परावर्तन कमी होतं. त्यामुळं फारसा प्रकाश तुझ्यापर्यंत पोचतच नाही. आता प्रकाश नसला की काय होतं?''

''काळाकुट्ट अंधार पसरतो.''

''हेच तर मला म्हणायचं होतं. त्यामुळं मग मीही काळा काळाच दिसतो. तुझ्या आजोबांना आंघोळ करून आल्याआल्या तू बघितलं आहेस का?''

''एरवी पांढरे शुभ्र असणारे त्यांचे केस त्यावेळी बघ भुरके-भुरके, मधूनच काळेकुळकुळीतही दिसतात. ते काही कलप लावत नाहीत, पण आंघोळ करून आल्यावर केसांतलं सगळं पाणी पुसून काढलेलं नसतं. थोडं पाणी केसांमध्ये शिल्लकच राहतं. ते केसांवर पडणारा प्रकाश शोषून घेतं. आणि त्यामुळं मग तेही काळे काळेच दिसतात.''

''म्हणजे मग तुझे दोनच रंग, एक पांढरा तरी नाहीतर काळा तरी.''

''हट्, मुळीच नाही. सूर्यास्ताच्या वेळी माझ्याकडे बघ. लालजर्द, केशरी, सोनसळी पिवळा असे मजेशीर रंग असतात माझे.''



''हो ना. पण ते कसं काय?''

''कारण त्यावेळी सूर्याचा प्रकाशही त्याच रंगांचा असतो. त्यावेळी सूर्य पृथ्वीला समांतर वातावरणातून येत असतो. त्यामुळं त्याच्या प्रकाशातले काही रंग दुसरीकडेच विखुरले जातात. आणि तुमच्यापर्यंत पोचतात ते तांबडा, नारिंगी , पिवळा वगैरे रंग. तेच मी परावर्तित करतो आणि रंगपंचमीच खेळतो. आणि आता श्रावण येईल. 'क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे' असा माहोल तयार होतो. त्यावेळी मग आकाशातच विहरत राहिलेल्या माझ्या पाण्याच्या थेंबांमधून ते किरण जातात आणि 'गोफ दुहेरी विणलासे' असं इंद्रधनुष्य दिमाखात दिसायला लागतं. त्याचीच छटा मग माझ्यावरही पडते आणि मीही त्या सात रंगांमध्ये डुंबून जातो.''

''आता श्रावण येऊ घातलाय. या महिन्यात आमची मज्जाच मज्जा असते. भरपूर सण असतात. आई काय काय छान छान खायला घालते. सुट्याही असतात बऱ्याच. धम्माल असते.''

''असते ना? मग यंदा आणखी धम्माल कर. माझं रंगीबेरंगी रूपही बघ. ते तेवढे रंग का दिसतात हे दोस्तांना सांगून चकित कर.''

''हो, हो, अगदी फुल टू धम्माल येईल. पण ढगोबा—''

''आता पुरे झालं. आता आवर माझी ही मुलाखत. मला त्या पुढच्या गावावर शिडकावा करायला जायचंय. तिथले शेतकरी वाट पाहताहेत रे माझी. त्यांना नाराज करून कसं चालेल?''

''बाय ढगोबा आणि थँक्यू. थँक्यू व्हेरी मच.''

**-डॉ.बाळ फोंडके**
*balphondke@gmail.com*



# ढगांचे रौद्ररूप

उत्तराखंडामध्ये ढगफुटी का झाली, त्याचे परिणाम म्हणून एवढा भीषण संहार का झाला, ते समजून घेऊ या.

**इंग्रजी भाषेमध्ये** हवामानाचा विचार करताना weather आणि climate असे दोन शब्द वापरायची पद्धत आहे. मराठीत मात्र या दोन्ही संकल्पनांना आपण हवामानच म्हणतो. 'वेदर' म्हणजे काही तासांपुरते किंवा दिवसांपुरते होणारे हवामानातले बदल. उदाहरणार्थ, एखाद्या दिवशी मुसळधार पाऊस येतो तर एखाद्या दिवशी जळजळीत उन्हाचा मारा होतो. या उलट, 'क्लायमेट' या शब्दाने एखाद्या ठिकाणचे पुष्कळ वर्षांपासून चालत आलेले हवामान होय. जसे काश्मीर, हिमाचल प्रदेश हे कायम थंडी असलेले भू-भाग तर राजस्थान, तामिळनाडू हे उन्हाळी प्रदेश. संपूर्ण पृथ्वीवरच्या सरासरी हवामानाला 'ग्लोबल क्लायमेट' असे म्हणतात. 'वेदर' आणि 'क्लायमेट' या शब्दांनी तुमच्या डोक्यात गोंधळ उडाला असेल तर हे लक्षात ठेवा- क्लायमेटनुसार आपला ठरावीक पोशाख ठरलेला असतो, जसे काश्मीरी पेहराव थंड प्रदेशासाठी, तर केरळातील लोकांची सुती लुंगी. पण एखाद्या दिवशी आपण कोणते कपडे वापरायचे हे 'वेदर'वर अवलंबून असते. पावसाळी दिवसांत तुम्ही हाफ-पॅन्ट वापरताच की नाही ? श्रेष्ठ अमेरिकन लेखक मार्क



ट्वेन यांनी म्हटलंय, “Climate is what we expect and weather is what we get.” (आपण ज्याची अपेक्षा करतो, ते क्लायमेट आणि आपल्याला ज्याला सामोरं जावं लागतं ते वेदर)

जसजशी मानवी लोकसंख्या वाढू लागली तसा निसर्गातल्या साधनसंपदांवर ताण पडू लागला. नवनव्या शोधांमुळे, वैज्ञानिक प्रगतीमुळे वेगाने औद्योगिकीकरण झाले. आपल्याला फक्त आपल्याच जगण्याकडे –पैशाकडे आणि ऐषोरामाकडे बघण्याची प्रवृत्ती वाढली. त्यामुळे निसर्ग कसाही ओरबाडू लागलो. या साऱ्याचा एकत्रित परिणाम म्हणजे जागतिक हवामान बदल किंवा global climate change. आपण पर्यावरण पक्रियेत केलेल्या लुडबुडीमुळे हरितगृह परिणाम, जागतिक तापमान वाढ, हिम वितळणे, समुद्राच्या पातळीत वाढ आणि त्यामुळे सखल किनारपट्टीचा प्रदेश व बेटे पाण्याखाली जाणे अशी श्रृंखलाच सुरू झाली. संपूर्ण पृथ्वीवर आलेल्या हवामानबदलाचे संकट दृश्य स्वरूपात जगभरात दिसू लागले आहे.

आपल्या भारतात हवामान बदलामुळे आलेल्या नैसर्गिक आपत्तींमुळे १.५६ लाख कोटी रुपयांचे

नुकसान केवळ २००७ ते २०१२ या पाच वर्षांत झाले आहे; तर २००१ ते २०११ या दहा वर्षांत २२,००० हून अधिक लोकांना प्राण गमवावे लागले. यात आपण अलीकडे उत्तराखंडात झालेला हाहाकार धरलेला नाही. ढगफुटीच्या आणि पुराच्या या महाभयानक संकटाच्या बातम्या आणि छायाचित्रे तुम्ही पहिली असतीलच.

आता ही ढगफुटी का होते ते समजून घेऊ. भारतातल्या भू-भागाचे तापमान वाढत चालले आहे. याला कारणीभूत ठरणारा महत्त्वाचा घटक म्हणजे कार्बनडायऑक्साइड वायूचा पृथ्वीभोवतालचा थर. कार्बनडायऑक्साइड वनस्पतींकडून वापरला जातो आणि त्यांची प्रकाश-संश्लेषणाची क्रिया न बोलता चालू असते. त्या बदल्यात ते आपल्याला लागणारा ऑक्सिजन पुरवतात. वनस्पती आणि प्राणी यांच्यातले हे एकमेकांना पूरक असलेले नाते पर्यावरणाचा समतोल ठेवते. आता आपण जंगलेच्या जंगले नष्ट करतोय, डोंगर कापतोय, नद्या बुजवतोय, सागर मागे ढकलतोय, सिमेंट कांक्रीटची जंगले निर्माण करतोय. खूप मोठ्या प्रमाणावर जीवाश्म इंधने वापरतोय. या इंधनाच्या ज्वलनाने मिथेन, कार्बन मोनॉक्साइड असे अनेक वायू वातावरणात सोडले जाताहेत. या वायूंचे आवरण हरितगृह परिणाम करते. एरवी जर हे वायूचे आवरण नसेल तर पोहोचणारी सूर्याची ऊर्जा बऱ्याच अंशी परावर्तित होऊन बाहेरच्या अवकाशात जाते, पण हरितगृह वायूचे कवच ही उष्णता आता पृथ्वीपाशीच धरून ठेवते. त्यामुळे पृथ्वीचे तापमान सतत वाढत चालले आहे. यामुळे जास्त प्रमाणात, भूपृष्ठावरून आणि समुद्रातून बाष्पीभवन होते. या वाफेचे सांद्रीभवन होऊन खूप मोठ्या प्रमाणात वृष्टी होते. भारताच्या पश्चिमेला अरबी समुद्र आणि पूर्वेला बंगालचा उपसागर तर उत्तरेला हिमालयाचा बांध, त्यामुळे भारतात फार मोठ्या प्रमाणात ढगफुटीचा धोका संभावतो. ढगफुटी म्हणजेच थोड्या अवधीत गडगडाटासह मुसळधार वृष्टी होणे. १९९७पासून ते अगदी आताच्या उत्तराखंडातील दुर्घटनेपर्यंत ढगफुटीच्या अशा जवळजवळ १८ घटना आपल्या भारतात घडल्या आहेत.

उत्तराखंडातील १५ जून २०१३च्या ढगफुटीने ५,०००च्या वर जीव घेतले, जवळपास ८४,००० लोक पुरात आणि कोसळलेल्या दऱ्या-डोंगरांत अडकून पडले. यातच भर म्हणून केदारनाथ इथल्या एका हिमनदीने वितळून पुराच्या पाण्यात वाढ केली. पर्यावरणाचे अजिबात भान न ठेवता केलेल्या 'विकास' ( ?) कार्याने सर्वच पट्टा भकास केला, तेही केवळ काही तासांत. जागतिक पातळीवर काम करणारे वैज्ञानिक सांगत आहेत की, हरितगृह परिणामाचे गांभीर्य अशा प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीतून स्पष्ट होत आहे. हरितगृह वायूंच्यामुळे भारतातील मोसमी पावसाने आपला नियमितपणा सोडला आहे. एकीकडे अतिवृष्टीची आपत्ती तर दुसरीकडे आता हे सारे घडत असताना आपल्याला पृथ्वीचे आरोग्य टिकवायला पाहिजे ना! तरच आपणसुद्धा इथे सुखाने राहू शकतो. हवामानबदलाचे संकट थोपविण्यासाठी तुमच्या चिमुकल्या हातांनी काय काय करता येईल, याचा विचार तुम्ही सतत केला पाहिजे. अनेक छोट्या-छोट्या गोष्टी नेटाने व नेमाने केल्या तरच आपण हे संकट थोपवू शकू.

**-नंदिनी देशमुख**
*nanddesh@gmail.com*



'श्रावणमासी हर्ष मानसी...' ही बालकवींची अजरामर कविता ती तुम्ही वाचली आहे ना? या कवितेची कितीतरी विडंबनं वेगवेगळ्या कवींनी केली आहेत. त्यातील हे एक दर्जेदार विडंबन गीत–

## श्रावणाची ही सुंदर कविता वाचा

हासरा नाचरा, जरासा लाजरा,
सुंदर साजिरा श्रावण आला
तांबुस कोमल पाऊल टाकीत
भिजल्या मातीत श्रावण आला

मेघांत लावीत सोनेरी निशाणे
आकाशवाटेने श्रावण आला
लपत, छपत, हिरव्या रानात,
केशर शिंपीत श्रावण आला

इंद्रधनुष्याच्या बांधित कमानी
संध्येच्या गगनी श्रावण आला
लपे ढगामागे, धावे माळावर,
असा खेळकर श्रावण आला

सृष्टीत सुखाची करीत पेरणी
आनंदाचा धनी श्रावण आला

**– कुसुमाग्रज**

## विडंबन कविता

*(बालकवींची क्षमा मागून)*

*श्रावणमासी खेद मानसी*
*हिरवळ गेली कुणीकडे?*
*शहरे भरली इमारतींनी*
*डांबर फरशा चहूंकडे! ॥१॥*
*मनू बदलला, अणू फोडिला,*
*निसर्गातही बदल घडे*
*श्रावणमासी तो मौजेचा*
*पाऊस आता कुठे पडे! ॥२॥*
*राने तुटली, कुरणे हटली,*
*उजाड हे डोंगरमाथे*
*सुंदर हरिणी हिरव्या कुरणी*
*कुठे कशी मग बागडते? ॥३॥*
*सुवर्णचंपक अजून फुलतो*
*रम्य केवडा दरवळतो*
*नगरनिवासीजन-हौसेस्तव*
*बाजारी विकला जातो! ॥४॥*
*थकून भागून घरी परतती*
*ललना सायं-समयाला*
*हर्ष न उरतो, हृदयी त्यांच्या*
*देवदर्शना निघण्याला! ॥५॥*
*प्रदूषणाने जीवन अवघे*
*होऊनि गेले संत्रस्त*
*कुठे कुणाच्या वदनी वाचू*
*श्रावण महिन्याचे गीत? ॥६॥*

**– म.के. दामले**

# ढगॉलॉजी

**आकाशात** चित्रविचित्र आकार धारण करणारे ढग आपण फक्त एक ‘थोडीशी गंमत’ म्हणून बघतो आणि विसरून जातो. पण या ढगांचा अभ्यास सौंदर्यशास्त्राच्या दृष्टिकोनातूनही केला जातो. या ‘ढगसौंदर्याभ्यासाला’ म्हणतात नेफॉलॉजी (Nephology). (Nephos) ‘नेफोस’ या शब्दाचा ग्रीक भाषेत अर्थ आहे ढग. त्या ढगांचा अभ्यास म्हणजे नेफॉलॉजी आणि ढगांचा अभ्यास करणारे ‘नेफॉलॉजिस्ट’ (Nephologist).

पाऊस कधी पडणार, किती, केव्हा या हवामानशास्त्रातील प्रश्नांचा या ‘नेफॉलॉजी’ किंवा मराठीत ‘ढगॉलॉजी’शी काहीही संबंध नाही. ढगांचे सौंदर्य न्याहाळणे, आकारमानाप्रमाणे आणि आकाशातील त्यांच्या जागेनुसार ढगांचे प्रकार पाडणे, त्यांना योग्य ती नावे देणे आणि मुख्य म्हणजे या साऱ्याचा मनसोक्त आस्वाद घेणे म्हणजे ‘नेफॉलॉजी’ ऊर्फ आपली ‘ढगॉलॉजी’!



ढगांचे निरीक्षण करणे, फोटो काढणे, त्यांना समर्पक नाव देणे हा एक छंद आहे. हा छंद जपणारे जगभरातील लोक एकमेकांच्या संपर्कात राहण्यासाठी **‘The Cloud Appreciation Society’** चे सदस्य होतात.

ढगांवर प्रेम करणारा कुणीही 'नेफॉलॉजिस्ट' होऊ शकतो. त्याला कुठल्याही विद्यापीठ, महाविद्यालयाच्या पदवी अथवा पदविकेची आवश्यकता नाही. ढगांवर निव्वळ नाही, तर अभ्यासपूर्वक प्रेम करणे ही अट, ढगांचे फोटो काढून ते इंटरनेट, मोबाइल, मासिक -वृतपत्रांद्वारे इतर ढगप्रेमींशी वाटून घेणे हा नियम, एवढीच ह्या शास्त्राची माफक अपेक्षा आहे.







*पिसासारखा ढग*

या शास्त्राची सुरवात झाली १८०३ साली ! म्हणजे आपली 'ढगॉलॉजी' तब्बल २१० वर्षे जुनी आहे. इंग्लंडचे ल्युक हावर्ड (Luke Howard-जन्मवर्ष १७७३ ते मृत्यू १८६४) यांनी प्रथम



*मॅरेथॉन मॅन!*

ढगांची अभ्यासपूर्वक वर्गवारी केली आणि पहिला लेख १८०३ साली लिहिला. तेव्हा प्रसारमाध्यमे काय तर वृत्तपत्रेही नव्हती! ल्युक हावर्ड जमेल तिथे मुलं, तरुण जमवीत आणि ढगांबद्दल माहिती देत. 'नेफॉलॉजीचा' हा प्रसार मौखिक ज्ञानप्रसारातूनच झाला, असे म्हणावयास हवे .

समुद्रसपाटीपासून ते ६०००फूट उंचीपर्यंत आकाशात जे ढग दिसतात, त्याचे तीन प्रकार पडतात.

1)Stratus
2)Cumulus
3)Stratocumulus

Stratus म्हणजे चटई, सतरंजी अथवा पायघड्या घातल्याप्रमाणे पसरलेले दिसतात ते ढग.

कॉलिफ्लॉवरच्या फुगीर, भरीव फुलासारखे दिसणारे ढग म्हणजे Cumulus. हे Cumulus ढग पसरून चटई तयार झाली की Stratocumulus सोबत जोडलेल्या ढगांच्या प्रकाराचा तक्ता पाहिला तर ६,०००फूट ते १८,००० फुटांवरील ढग दिसतील, ते Altostratus आणि Altocumulus. १८,०००फुटांवरील कुरळ्या केसांसारखे दिसणारे ढग म्हणजे Cirrocumulus आणि त्याहूनही उंचावर म्हणजे ५०,००० फूट किंवा अधिक उंचीवर दिसणाऱ्या ढगांना म्हणतात- Cumulonibus. ही झाली ढग अभ्यासाची प्राथमिक माहिती. पुढे वाढवू तेवढा अभ्यास कमीच आहे. पण यात कठीण काहीच नाही. जगभरातील सजग ढगप्रेमींनी एकत्र येऊन एक संस्था स्थापन केली आहे, ज्यायोगे अपरिचित देशातील कोणत्याही अनोळखी व्यक्तीशी आपण ढगांबाबत माहितीची देवाणघेवाण करू शकतो. ही संस्था सभासदांसाठी दर महिन्याला एक मासिक (आता online ही)निघते. जगभरातील ढगप्रेमी नुकत्याच पाहिलेल्या छानदार ढगांचे फोटो इथे पाठवतात. त्यांतील सर्वोत्कृष्ट ढगास 'Cloud of the month' चा खिताब मिळतो. नुकताच प्रसिद्ध झालेला जून २०१३ चा सर्वोत्कृष्ट ढग पाहा, कसा शर्यतीत धावणाऱ्या स्पर्धकासारखा दिसतो आहे! त्याचे नाव ठेवले आहे- Marathon man- मॅरेथॉन मॅन!

या संस्थेची वेबसाइट पाहिलीत तर इथे फक्त ढगांचे फोटोच नाही, तर ढगांबद्दलची कोडी, गेम्स, विनोदही सापडतील. उत्साही आणि उद्योगी मुलांसाठी घरच्या घरी ढग बनवण्याची कृतीदेखील व्हिडिओसकट मिळेल. आहे की नाही गंमत? cloudsapp ही मोबाइलवर फुकट उतरवून घेता येईल! एवढेच नाही तर, वेळ आणि खर्च करण्याची तयारी असेल तर 'ढग दर्शन' पिकनिक्ससुद्धा असतात- त्याही जगभरातील निरनिराळ्या देशांत!

आता श्रावण महिना सुरू आहे. मुसळधार पावसाचा जोर कमी होऊन ऊन-पावसाची गंमत सुरू असेल. या महिन्यात ढग बघण्याची मजा काही अवर्णनीय असते बरं!

बघा, तुम्हांलाही एखादा अवलिया ढग दिसतो का? आणि दिसलाच तर फोटो काढून 'वयम्'ला पाठवा. त्याला छानसं नावही द्या!

**-कृपा कुलकर्णी**
*krupa.kulkarni@yahoo.com*

असे आकर्षक ढग पाहण्यासाठी
*The Cloud Appriciation Society*
या वेबसाइटला भेट द्या.

दुर्गा भागवत या मराठीतील ज्येष्ठ लेखिका. त्यांच्या ‘ऋतुचक्र’ पुस्तकातील ‘श्रावण सावळी’ या प्रकरणातील हा अंश. श्रावणातील सूर्याचे सुंदर वर्णन यात आहे.

# श्रावण सावळी

**श्रावणातल्या** पावसाची आणि ढगांची मजा किती आणि कशी सांगावी ? सूर्यबिंब तर अगदी दिसत नाहीसे झाले आहे. पाऊस जरा थांबला आहे, वारा खूप सुटला आहे; ढग पांगताहेत आणि दूर जाता जाता सरड्याप्रमाणे रंग बदलताहेत. किती हे रंग ! पश्चिमेच्या क्षितिजाजवळ मोठे जांभळे ढग काळ्याकबऱ्या आकाशभर पसरलेल्या ढगांतून एकदम उसळी मारतात. मग ते पांगू लागतात आणि त्यातून तांबूस जांभळे ढग निघतात. त्यांच्यातून तांबडे ढग निघतात आणि मग लिंबी रंगाचे पिवळेजर्द ढग हसू लागतात. ते जरा फाकून एक सुंदर केशरी कडे जांभळ्या ढगांत लोळू लागते. पिवळा प्रकाश खुलतो. वातावरण उजळते. जवळजवळ अर्धा तास ही रंगपंचमी चालू असते आणि मग जांभळे ढग फिरून आक्रमण करून लाल पिवळ्या छटा दडवतात. आणि काळ्या धूसर ढगांचे पांघरूण घेऊन पावसाच्या सरींचे गाणे ऐकत ते झोपून जातात. काही क्षण ढगांचे




गुलाबी आणि काळा रंग एकत्र होऊन भयाण छटा पश्चिमेला दिसू लागते. नुसता काळा रंग असा भयाण कधीच दिसत नाही. पण काळ्यात गुलाबी रंग घाला, की पाहा कसे काटे अंगावर येतात ते. जणू मृत्यूचीच सावली. भारी उदास वाटते मला तो ढगांचा संध्याकाळचा रंग पाहून. पण लवकरच रात्र होते आणि गडद काळोखाचे तरंग दाट होत होत सारे आकाश एका रंगाचे काळे धूसर होते. वीज चमकली की काळे-पांढरे ढग तेवढे अलग दिसतात. आणि एक गंमत पाहा, या ढगांनी व्यापून गेलेल्या आकाशाची, बिजलीची चमक सोडली तर वास्तविक सगळ्या स्वर्गस्थ ज्योती यांनी झाकून टाकलेल्या. त्याच्यामुळेच रात्री काळोख्या असतात. तरी पण आकाशाकडे मध्यरात्री पाहा, पाऊस मुसळधार पडतानासुद्धा, शेजारचे घर एक वेळ सरींच्या पडद्यातून दिसणार नाही, पण आकाश मात्र निराळे आणि पांढरटच दिसते. अंधाऱ्या वातावरणात जरासाही पांढरा रंग अधिकच पांढरा दिसतो. तसेच संध्याकाळी धुरकट वाटणारे ढगच आकाशाला पांढरेपण देतात. एरवी आपल्या आजूबाजूला काळोख दिसला तरी आकाशातला उजळा मंद का होईना, टिकूनच असतो.

सकाळ झाली तरी पूर्वेला गुलाबी रंग आता नाचत नाहीत. पांढरेपणाचा उजळाच तिथे दिसतो. रुप्याच्या रंगासारखे तेज ढगांतून कडाकडांनी धावत असते. सोनेरी मुलामा नेहमीप्रमाणे नसतोच. श्रावणातला हा झाकल्या सूर्याचा रुपेरी प्रकाश मला फार आवडतो.

एक दिवस दुपारची वेळ होती. श्रावणाचा मध्य होता. पावसाच्या सरी आल्या की झोडपल्याप्रमाणे येत होत्या. पण मध्ये तास तास पावसावाचूनही जात होता. माध्यान्ह टळल्यामुळे सूर्य किंचित पश्चिमेकडे झुकला होता. पावसाची काळोखी जाऊन एकदम रुपेरी प्रकाशाची झळक दिसल्यामुळे मी वर पाहिले, तो काय ? ढगांच्या सात वेगळ्या आवरणांखाली दडलेल्या, मोत्यासारख्या सौम्य रंगाच्या सूर्याचे दर्शन मला झाले. पहिल्याने भुरकट रंगाचे ढग फाकले. बाजूला गडद निळ्या-काळ्या ढगांच्या राशी जमलेल्या होत्या. मग वाऱ्याच्या झुळकीने ते भुरकट ढग पांगू लागले. अधिकाधिक पारदर्शक होऊ लागले. एकाहून एक छटांनी पांढरी असणारी अभ्रे बाजूला होऊ लागली. आणि मग मध्येच आकाशाची पोकळी थोडी थोडी दिसू लागली. पहिल्याने धुरकट, मग निळी; अभ्रे आणि ऊन एक झाल्यामुळे हिरवी अशी ती लहानशी पोकळी दिसू लागली. बाकी आकाशभर ढग पसरले होते. पण सूर्यबिंबाच्या जवळच्या टीचभर जागेतच हे सारे खेळ होत होते. मग ती पोकळी मोठी मोठी होऊ लागली. ढग विरळ होत होते. अधिक पोपटी छटा तिथे नाचत होत्या. मग त्या पोपटी छटाही विरत गेल्या. शिंपलीसारखे रुपेरी सूर्यबिंब – त्याला सूर्याचे बिंब केवळ वाटोळ्या आकारावरूनच म्हणायचे. किरणांचा पसारा नाही. ते सुवर्णजाल नाही. काही नाही. तरी पण थिजल्यासारखी होऊन मंद झालेली, ढगातच विरलेली ती किरणे या श्रावणातल्या सूर्याला अपूर्व शोभा देत होती. अनिमिष नेत्रांनी तो रुपेरी सूर्य, तो मेघरूप, पर्जन्यरूप सूर्य मी पाहत होते. जाईजुईच्या झेल्यासारखा हातात धरून त्याला हुंगावे असे वाटत होते. सूर्यबिंब इतके जवळचे, आपल्या आटोक्यातले, सौम्य आणि हृद्य एरवी कधीच वाटत नाही. पावसाळ्यातले हे पांढरे सूर्यबिंब पाहणे हा माझा एक आवडीचा छंद आहे.

**सौजन्य : पॉप्युलर प्रकाशन, मुंबई**



मुलांनो,
नागपंचमीचा संदेश
देणारे हे पान तुमच्या
वसाहतीत, शाळेत
लावा हं!

# आम्हांला वाचवा !



### बिनविषारी साप

१) दूध व लाह्या हे माझ्यासाठी विषासारखे आहे.

२) मला ऐकू येत नाही, माझ्या रक्षणासाठी मी हालचाल करतो.

३) मी उंदीर खाऊन तुमचे अन्नधान्य वाचवतो.

४) मला पकडून माझी पूजा करण्यापेक्षा कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कागदाची, मातीची प्रतिकृती करून त्याची पूजा करा.

५) मी डूक धरत नाही, कारण माझी स्मरणशक्ती विकसित झालेली नाही.

६) आम्हा कुठल्याही सापाच्या डोक्यावर नागमणी नसतो.



### विषारी साप

१) मीही उंदीर खाऊन तुमचे अन्नधान्य वाचवतो.

२) माणसाच्या अंगात गेलेले आमचे विष मंत्रतंत्राने उतरत नाही.

३) सर्पदंशावर प्रति सर्पविष हेच एकमेव औषध आहे.

४) सर्पदंश झाल्यावर, दवाखान्यात वेळ न घालवता त्वरित नेणे हा एकमेव उपाय आहे.

५) कोणत्याच नागाच्या डोक्यावर नागमणी नसतो. उंदीर सरासरी ३० ते ३५ टक्के अन्नाची नासाडी करतात.

६) सापाची हत्या करणे, त्यांच्या अवयवांचा वापर करणे हा गुन्हा आहे व त्याला शिक्षा होऊ शकते.

**माणसांनो, मी तुमचा मित्र आहे आणि तुमच्या भल्यासाठीच वळवळ करतो!**

**–सुनीता ओक**
*अंधश्रद्धा निर्मूलन समिती, गोरेगाव*

# सापांना अभय देणारे 'मित्र'



**हाय फ्रेंड्स!** शाळा सुरू होऊन तुमचं रुटीन एव्हाना सेट झालं असेल. पाऊसही आता कमी झालाय. मग आता happening काय आहे बरं? आता मोस्ट happening आहे श्रावण महिना! श्रावणात म्हणजे फुल टू धमाल असते. वेगवेगळी व्रतंवैकल्यं असतात, प्रथा-परंपरा असतात आणि खाण्याचीसुद्धा एकदम व्हेजिटेरियन चंगळ असते. आपल्या संस्कृतीत ज्या गोष्टी सांगितल्या जातात त्या जर आपण आजच्या काळाशी नीट रिलेट केल्या ना, तर खूप 'सही' वाटतं. आपणही आज तसाच काहीसा प्रयत्न करूया.

श्रावण पंचमी म्हणजे नाग पंचमी. या दिवशी अनेक लोक अगदी भक्तिभावाने नागाची पूजा करतात, त्याला दूध देतात. आजच्या काळात नागाची पूजा करायची आवश्यकता आहे का? नागाला दूध खरंच आवडतं का? सगळेच साप विषारी असतात का? आपण घरात साप पाळू शकतो का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरं







मिळवण्यासाठी भेटूया अभयकाकांना. त्या आधी त्यांची थोडीशी ओळख करून देते. ठाण्याला राहणारे अभय पावगी, 'सर्पमित्र' आहेत. लोकांपासून सापांना आणि सापांपासून लोकांना वाचवण्याचं काम ते गेली अनेक वर्षं करतायत. त्यांना ट्रेकिंग, mountaineering, पक्षी-निरीक्षण आणि फोटोग्राफी करण्याची खूप आवड आहे. साधारण १९८८-८९ मध्ये अभयकाका त्यांच्या दोन मित्रांसोबत भीमाशंकरला गेले होते. तेव्हा एक मण्यार (म्हणजे सापाचा एक प्रकार) त्यांना दिसली. तेव्हापासून त्यांच्या मनात सापांविषयी उत्सुकता निर्माण झाली. पुढे मग तळेगावला नोकरीनिमित्त राहत असताना, त्यांना तिथे एक सर्प प्रदर्शन पाहण्याची संधी मिळाली आणि तिथल्या सर्पमित्र असणाऱ्या ग्रुपशी त्यांचा संपर्क वाढला. तेव्हा अभयकाका घरी एकटेच राहत असल्यामुळे सर्पमित्रांनी पकडलेले साप त्यांच्याच घरात ठेवले जात. एकाच वेळी त्यांच्या घरी ३०-४० सापसुद्धा असायचे! तेव्हा शेतकऱ्यांसाठी एक सर्प-जागृती उपक्रमही ते करायचे. तळेगावहून अभयकाका ठाण्याला आले आणि तिथे त्यांच्या कंपनीच्या आवारातच त्यांना एक साप मिळाला, तो त्यांनी येऊरच्या जंगलात सोडला आणि तेव्हापासून ठाण्यातही त्यांचं नाव सर्पमित्र म्हणून घेतलं जायला लागलं. मनुष्यवस्तीत कुठेही साप निघाला तर अभयकाकांना बोलावणं येतं आणि तेही काहीही पैसे न घेता कॉल अटेंड करतात. त्यांचा फोन नंबर १०१ या फायर ब्रिगेडच्या नंबरवर सुद्धा मिळू शकतो.

अभयकाकांची ओळख तर मी तुम्हांला करून दिली, आता त्यांच्याशीच गप्पा करूया. साप पकडण्यासाठी गेल्यावर तिथले लोक अभयकाकांना बरेच प्रश्न विचारातात. त्याबद्दल अभ्यास करून त्यांनी सापांची भरपूर माहिती मिळवली.

अभयकाका म्हणाले, ''सापांच्या एकूण ३५० जाती आहेत. त्यापैकी ४७ विषारी आहेत. त्यातल्या २४ जाती तर खोल समुद्रात राहतात. त्यामुळे माणसांशी त्यांचा संपर्क येण्याची शक्यता अगदीच नगण्य असते. सर्वसाधारणपणे नाग, मण्यार, फुरसं आणि घोणस असे चार प्रकारचे विषारी साप आपल्याला बघायला मिळतात. विषारी सापांपैकी काही न्युरो टॉक्सिक असतात तर काही हेमो टॉक्सिक असतात. न्युरो टॉक्सिक सापांमुळे माणसाच्या नर्व्हज् सिस्टिमवर परिणाम होतो. त्यामुळे असा साप जर झोपेत चावला तर माणूस झोपेतच बेशुद्ध होऊन दगावतो. हेमो टॉक्सिक सापांमुळे रक्तवाहिन्यांवर परिणाम होऊन रक्तस्त्रावाने माणूस मृत्यू पावतो. कुणालाही साप चावला तर ताबडतोब त्या व्यक्तीला सिव्हिल हॉस्पिटलमध्ये घेऊन जावं. साप चावल्यावर साधारणतः दीड तासाने त्याची लक्षणं दिसायला लागतात.''

नागपंचमीला नागाला सर्रास दूध पाजलं जातं. नागाला दूध खरंच आवडतं का, सापाचं नेमकं खाणं काय असतं असं विचारल्यावर अभयकाकांनी सांगितलं, ''दूध हे साप / नागाचा शत्रू आहे. दूध प्यायल्याने नागाला सर्दी होते, त्यातून न्यूमोनिया होतो आणि शेवटी त्याचा मृत्यू होतो. त्यामुळे सापाला कधीही दूध पाजू नये. मण्यार आणि कोब्रा हे इतर साप खाऊन जगतात. जर इतर साप नाही मिळाले, तर मण्यार एकवेळ बेडूक वगैरे खाते, पण नाग मात्र सापाशिवाय दुसरं काहीही खात नाही. बिनविषारी साप भक्ष्याला पकडून, विळखा घालून सफोकेट करून मारतात आणि मग खातात, तर विषारी साप भक्ष्याला डंख मारतात आणि सोडून देतात. सावज थोड्या अंतरावर जाऊन मेल्यावर त्याचा माग काढत जातात आणि मग ते खातात. तोपर्यंत सावजाच्या अंगात सापाचा लाळेसारखा द्रवही इंजेक्ट झालेला असल्यामुळे ते सावज पचण्यासाठी सोपं होतं. सापाचे पाचक-रस सूर्यप्रकाशाशी संपर्क आल्यावर activate होत असल्याने बऱ्याचदा साप भक्ष्य पचवण्यासाठी उन्हात बसतात. बिनविषारी सापांना विषारी सापांपेक्षा भक्ष्य पचवण्यासाठी जास्त वेळ लागतो.''

अभयकाकांच्या घरी साप, नाग वगैरे मोठ्या डब्यात बंद करून ठेवलेले असतात, वगैरे बरंच काही. या मुलाखतीसाठी त्यांच्याकडे जाण्याआधी ऐकलं होतं. त्यामुळे तिथे जाताना मनात जरा धास्तीच होती. पण अभयकाका म्हणाले की, साप सापडल्यावर त्याला जंगलात सोडेपर्यंत कधी कधी घरात ठेवावं लागतं. एखादा साप पकडल्यावर त्याला योग्य वेळी जंगलात सोडावं लागतं. मात्र जर आजारी असेल, अशक्त झाला असेल तर त्या अवस्थेत त्याला जंगलात सोडणं त्याच्या हिताचं नसतं किंवा मण्यारीसारखा साप असेल तर त्याला रात्रीच जंगलात सोडावं लागतं, कारण मण्यारीला रात्रीच दिसतं, दिवसा तिची दृष्टी क्षीण असते. अशा वेळी काही काळ साप घरात सुरक्षित ठेवावे लागतात. साप अनेक दिवस सुप्तावस्थेत राहू शकतो, त्यामुळे उजेड, अन्न, पाणी मिळालं नाही तरी बराच काळ साप जिवंत राहू शकतो. कधी दुष्काळ किंवा पूर परिस्थिती असेल तर अशा पद्धतीने सुप्तावस्थेत जाऊन स्वत:चं रक्षण करण्याची क्षमता निसर्गाने काही प्राण्यांना दिलेली आहे. त्यामुळे काही दिवसांसाठी साप घरात ठेवायची वेळ आली तर त्याची विशेष काही देखभाल करावी लागत नाही. पण साप पाळणं हे कायद्यात बसत नाही आणि साप हा काही पाळीव प्राणी नाही. तुम्ही वर्षभर साप अगदी प्रेमाने पाळलात तरी त्याला धोका जाणवला तर तो तुम्हांला चावतोच!

कोणी म्हणतं की साप वारुळात राहतो, कोणी म्हणतं की तो बिळात राहतो. सापाचं नक्की निवासस्थान कोणतं? अभयकाकांनी सांगितलं, ''२४ अंशापेक्षा जास्त तापमान हे सापासाठी योग्य नसतं. तापमान २४ अंशापेक्षा जास्त असेल तर साप अस्वस्थ होतात. वारूळ किंवा बिळात बाहेरच्या तापमानापेक्षा काही अंश कमी तापमान असतं. त्यामुळे या दोन्ही ठिकाणी साप कम्फर्टेबल असतो. पण साप स्वत: कधीच वारूळ किंवा बीळ तयार करत नाही. मुंग्यांचं वारूळ किंवा उंदीर, घूस, खेकडे, साळिंदर यांची बिळं हे सापांचं वसतिस्थान असतं. त्यामुळे



'आयत्या बिळावर नागोबा' म्हणतात, ते अगदी खरं आहे!''

बऱ्याचदा देवळात ज्या नागाच्या प्रतिमा असतात त्यांच्या तोंडात तांब्याचा पैसा किंवा तांब्याची वस्तू ठेवलेली दिसते. एक धार्मिक गोष्ट म्हणून हे केलं जातं पण त्यामागे खरंतर शास्त्रीय कारण आहे. सापाचं विष 'तांबे' या धातूवर पडलं तर त्यातले विषारी घटक नाहीसे होतात. इतर कुठल्याही धातूबरोबर ही अभिक्रिया होत नाही. त्यामुळे साप मेल्यावर त्याचं विष वातावरणात पसरून हानी होऊ नये म्हणून त्याला पुरण्याआधी त्याच्या तोंडात तांब्याची वस्तू ठेवली जाते. मेलेल्या सापाला कधीही जाळायचं नसतं, कारण साप जाळल्यावर जी राख राहते ती हवेत पसरणं हे धोकादायक असतं त्यामुळे मेलेल्या सापाला पुरणं हेच योग्य असतं, असंही अभयकाकांनी सांगितलं.

नागपंचमीला गारुड्यांकडून साप/नागांना त्रास होतो. अभयकाकांनी आजपर्यंत पुष्कळ साप जप्त केलेत. आता ठाण्यात एकही गारुडी नागपंचमीला नाग घेऊन फिरताना दिसत नाही! पूर्वीच्या काळी स्त्रियांना घराबाहेर पडता यावं, इतरांना भेटता यावं, म्हणून वटपौर्णिमा, नागपंचमी अशा व्रतांची निर्मिती झाली. आता तो उद्देश राहिला नसल्याने आपण काळाबरोबर बदललं पाहिजे, असं अभयकाकांना वाटतं. ते म्हणतात, पर्यावरणाच्या दृष्टीने आणि एकूणच सापांचं जैविक महत्त्व खूप आहे. साप उंदरांना त्यांच्या बिळात शिरून मारतात. उंदराची मादी तिच्या आयुष्यात साधारण एक हजार पिल्लांना जन्म देते आणि एक धामण जवळजवळ ऐंशी हजार उंदरांना नष्ट करते! जर साप नसतील तर सगळ्या जगात उंदरांचाच सुळसुळाट होईल आणि माणसाचंही जगणं कठीण होईल! नागपंचमीला नागाची पूजा करण्यापेक्षा सापांविषयी माहिती मिळवून त्यांच्याबद्दलची मनातली भीती, घृणा काढून टाकणं, सापांना त्रास न देणं या गोष्टी आता केल्या जायला हव्यात.

सापांना गंधज्ञान नसतं, त्यांना ऐकूसुद्धा येत नाही, मग गारुड्याने पुंगी वाजवली की साप कसा डोलतो हा एकदम 'नागपंचमी स्पेशल प्रश्न' माझ्या मनात होताच. अभयकाकांनी आमच्या गप्पा संपता संपता सांगितलं की, गारुडी त्यांच्या त्या पुंगीला एखादा गडद रंगाचा गोंडा किंवा कापडाचा तुकडा वगैरे बांधतात. साप त्या रंगाकडे बघून डोलतो!

अभयकाकांशी गप्पा, त्यांच्याकडचे फोटो बघणं हा माझ्यासाठी तर सॉलिड एक्स्पिरियन्स होता. आता मी सापाला घाबरणार नाही आणि कुठेही साप दिसला किंवा सापाला कुणी त्रास देतंय असं जरी दिसलं, तरी लगेच अभयकाकांना फोन करणार. तुम्ही पण कराल ना?

**संपर्क**– अभय पावगी ९७६९११०११३

**–अंजली शेवडे**
*anjalicoolkarni@gmail.com*



# कल्पकला

# खाऊच्या राख्या

## चॉकलेट राखी



**साहित्य-** आकाराने मोठं एक चॉकलेट, सॅटिन रिबीन, सोनेरी रंगाचा जाडसर कागद किंवा त्या चॉकलेटच्या कव्हरला शोभेलशा रंगाचा कागद.

**कृती** - प्रथम सोनेरी रंगाचा कागद फुलाच्या आकारात (चॉकलेटच्या बेसपेक्षा मोठ्या आकारात) कापून घ्यावा. नंतर तो कागद चॉकलेटच्या खालील बाजूस सेलोटेपच्या साहाय्याने चिकटवून घ्यावा. त्याच आकाराचा आणखी एक गोल कापून सेलोटेपने चॉकलेटच्या वरील बाजूस चिकटवून घ्यावा. त्या गोलावर स्केचपेनने नाक, डोळे व हसरे ओठ काढावे किंवा टिकल्या चिकटवाव्यात. आता चॉकलेटचे कव्हर जिथे दोन्ही बाजूंनी व्टिस्ट् केलेले असते, तिथे सॅटिन रिबीनचे प्रत्येकी एक असे तुकडे बांधावे.

***अशी आपली चॉकलेटची राखी तयार होईल व बघताक्षणी छोट्या भावंडांना नक्कीच आवडेल.***

## बिस्किटांची राखी

**साहित्य-** एक मारी बिस्कीट, एक जॅम असलेले (जिम-जॅम बिस्कीट) किंवा क्रीम बिस्कीट, साखरेचा घट्ट पाक, बडीशेपेच्या रंगीबेरंगी गोळ्या, जेम्सच्या रंगीत गोळ्या, सॅटिनची रिबीन.

**कृती-** आई किंवा आजीकडून साखरेचा पाक बनवून घ्यावा. जॅम असलेल्या बिस्किटावर (वरील बाजूस) साखरेचा पाक लावून घ्यावा. त्यावर बडीशेपेच्या व जेम्सच्या गोळ्या चिकटवून घ्याव्यात. मारी बिस्किटावर (वरील बाजूस) साखरेचा पाक लावून घ्यावा. त्याच्या मधोमध जॅम असलेले बिस्कीट ठेवावे. त्याच्या बाजूने मारी बिस्किटावर बडीशेपेच्या गोळ्या लावाव्यात. सॅटिनच्या रिबिनच्या मधोमध पाक लावून घ्यावा. त्यावर हे संपूर्ण सजविलेलं बिस्कीट ठेवावं व सुकू द्यावं.

***अशाप्रकारे आपली बिस्किटांची राखी तयार होईल. ही राखी बनविल्यानंतर घट्ट झाकणाच्या डब्यात ठेवावी, जेणेकरून कुरकुरीत राहील.***

**-स्वरूपा वक्नाली**
swarupamv@gmail.com



–ऋता सबनीस



या चित्रातील इंद्रधनुष्याच्या सप्तरंगांपैकी काही रंग गायब झाले आहेत. मात्र ते रंग या चित्रातच इथे-तिथे दडले आहेत. ते शोधा आणि त्या इंद्रधनुष्यात भरा.

## प्रतिसाद

मराठी व इंग्रजी भाषेतले समान उच्चार असणारे शब्द परंतु वेगवेगळे अर्थ-

| | मराठी | इंग्रजी |
|---|---|---|
| सर | पावसाची सर | शिक्षक |
| विष | विष | इच्छा |
| फार | पुष्कळ | लांब |
| फूल | फूल | मूर्ख |
| केस | केस | खटला |
| फेस | साबणाचा फेस | चेहरा |
| बोट | हातापायाचं बोट | होडी |

**`अ' या अक्षरपासून सुरू होणाऱ्या शब्दांचे वाक्य-**

आयुषच्या आईने अमिताला अति आवडणारे आंबे आणले आणि अमिताच्या आईच्या ओट्यावर ओतले.

**`च' या शब्दापासून सुरू होणारे वाक्य**


चिपळूणच्या चिंगूताईंनी चार चिंचांची चटपटीत चटणी चमच्याने चंदूला चाटवली.

**–मनश्री मनोज भिडे**
*सरस्वती विद्यामंदिर, दापोली (इयत्ता–पहिली)*

# ‘वयम्’... मित्र!



**ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर**– ‘वयम्’ सारख्या मासिकाची आजच्या घडीला नितांत गरज आहे. तंत्रज्ञानामुळे आपली जीवनपद्धती बदलत आहे. नवीन तंत्रज्ञान, नवीन माहोल याचा चांगला उपयोग व्हावा, यासाठी पूरक अशी वाचनाची जोड असली पाहिजे. ‘वयम्’ची कल्पना या दृष्टीने सक्षम आहे.



**चतुरस्र व्यक्तिमत्त्व अच्युत गोडबोले**– आजच्या काळात मुलांसमोर वेगवेगळी आकर्षणं आहेत. अशा काळात असं मासिक जन्माला येणं ही मुलांच्या वाढीसाठी गरजेची गोष्ट आहे. आणि ‘वयम्’ ही गरज नक्की पूर्ण करेल. ‘वयम्’ वाचल्याने मुलांचा सर्वांगीण विकास नक्कीच होईल.



**ज्येष्ठ संपादक आणि ‘वयम्’चे सल्लागार कुमार केतकर**– ‘वयम्’ वाचून मुले प्रगत तर होतीलच आणि सुसंस्कृतही होतील. मुलांच्या सर्वांगीण विकासाला हातभार लावण्यात हे मासिक नक्कीच मदत करील, यात जराही शंका नाही.



**झी-२४ तास’चे व्यवस्थापक -संपादक डॉ. उदय निरगुडकर**– तुम्ही-आम्ही, आपण सारे कधी ना कधी लहान मूल होतो. आमच्या काळात इतकं चांगलं मासिक निघालं असतं तर आमचं बालपण अधिक चांगलं झालं असतं. मी माझ्या वयाची ४० वर्षं ओलांडल्यावरही लहान मुलांच्या कुतूहलाने ‘वयम्’चं स्वागत करतो.



**गुणी अभिनेत्री स्पृहा जोशी**– मुलांच्या इच्छा, आकांक्षा, अपेक्षा, कुतूहल शमवणारं, कल्पनांना चालना देणारं असं ‘वयम्’ हे मासिक आहे. ‘वयम्’ हे आजच्या मुलांचं भावविश्व टिपून त्यांचं व्यक्तिमत्त्व खुलवणारं माध्यम ठरेल.



**बालकलाकार मिहिर सोनी** – ‘वयम्’चा अंक मला खूप खूप आवडला. त्यात गोष्टी आहेत, आकर्षक चित्रं आहेत, कोडी, शब्दखेळ अशा ज्ञान वाढवणाऱ्या आणि मनोरंजन करणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. एरवी मला वाचायला फारसं आवडत नाही, पण ‘वयम्’चा अंक मात्र मला वाचावासा वाटतो.

# अच्युत गोडबोले यांच्याशी रंगलेला संवाद



'वयम्'च्या शुभारंभ विशेषांकाचा प्रकाशन सोहळा गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला (१० एप्रिलला) ठाण्यात झाला होता. त्याचा वृत्तान्त जूनच्या 'वयम्' मध्ये प्रसिद्ध झाला आहे. त्यावेळी चतुरस्र व्यक्तिमत्त्व अच्युत गोडबोले यांच्याशी 'वयम्' टीमने मारलेल्या गप्पांचे हे शब्दांकन–

**स्वरांश दीक्षित** – *'मुसाफिर'मध्ये (अच्युत गोडबोले यांचे आत्मचरित्र) उल्लेख केलेल्या तुमच्या मोडक्या-तोडक्या इंग्रजीपासून ते ग्लोबल इंग्रजीपर्यंतची तुमची सफर कशी काय केलीत?*

–हिंदी माझं खूपच वाईट होतं. मी बोर्डात सोळावा आलो तेव्हा हिंदीत १०० पैकी फक्त ४३ मार्क्स होते. आणखी सात जरी जास्त पडले असते तरी मी बोर्डात पहिला आलो असतो. 'मैं तुमको पुकार रहा था तब तू मेरे तरफ ढूंकी भी नहीं।' अशा तऱ्हेचं हिंदी असल्यामुळे मास्तरांनीही खूप वेळा प्रयोग करून सुधारायचा प्रयत्न केला, पण तरी काही ते सुधारलं नाही. पण इंग्रजीच्या बाबतीत असं काही झालं, की मी मराठी माध्यमातून शिकलो आणि IIT मध्ये गेलो तेव्हा सुरुवातीला इंग्रजीवरून कोणीतरी माझा अपमान केला. त्या इंटलेक्च्युअल अपमानाने मी चवताळून उठलो आणि पुढचे दहा महिने मी इंग्रजी लिटरेचर वाचले. इंग्रजी कादंबऱ्या, वृत्तपत्रे वाचली. आपण काही वेळा फक्त शब्द पाठ करतो. आपण मराठीतून विचार करतो आणि मग इंग्रजीतून ट्रान्सलेट करतो व मग पुन्हा इंग्रजीतून बोलतो. असं करायचं नाही, असं मी ठरवलं. आरशासमोर उभं राहून इंग्रजी बोलण्याची प्रॅक्टिस केली. आपल्याला जे काही येत नाही ते मान्य करायला मला कमीपणा वाटला नाही. पण खूप श्रम करून ते आपल्याला आलं पाहिजे, हा ध्यास मात्र आपण धरला पाहिजे.

**रश्मी कुलकर्णी** – *तुम्ही आजवर अनेक क्षेत्रांत काम केलंय, वेगवेगळ्या विषयांवर लिहिलंय, पण तुम्ही ज्या केमिकल इंजिनिअरिंग क्षेत्रात IIT मध्ये शिकलात त्यात तुम्ही काहीच केलं नाही. असं का?*

– मी कशात करीअर करणार असं काही ठरवलं नव्हतं. आजकाल म्हणे मुलं चौथीत ठरवतात, कोण होणार पुढे ते! IIT मध्ये मी बऱ्यापैकी टॉपर होतो. पण नंतर माझा एक ग्रुप जमला, मनात वैचारिक वादळ निर्माण झालं. त्यातून आदिवासी चळवळीत गेलो. तिथून परत आलो, तर जॉब मिळेना, कारण त्या चळवळीत मी सत्याग्रह करून जेलमध्ये गेलो होतो. मग मिळाला तो जॉब घेतला. तो इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी क्षेत्रातला जॉब होता. तो स्वीकारला. मग पुढे ३०-३५ वर्षे IT मध्ये काढली. खरं म्हणजे मी IT मध्ये योगायोगाने आलो. ठरवून नाही, स्कोप आहे म्हणून आलो नाही. मला अनेक क्षेत्रांत इंटरेस्ट असल्याने मी वेगवेगळ्या विषयांत रमत गेलो.

**वरुण पिटकर –** *तुमचा नावडता विषय कोणता? बराचशा मुलांचा नावडता विषय गणित असतो. गणित म्हणजे भयंकर- असं समीकरण. मी वाचलंय की IIT त तुम्हांला गणितात १००% मार्क्स मिळाले होते. तुमच्या या मार्कांमागचं रहस्य काय?*

– गणित मला पहिल्यापासून फार आवडत होतं. शिवाय माझे वडील गणिताचे तज्ज्ञ होते. परीक्षेकरता मी कधी जास्त अभ्यास नाही केला, पण सहावीत असताना आठवीचे रायडर्स सोडवायचो. तीच रायडर्स नव्या नव्या पद्धतीने सोडवायचो.

**वरुणचा उपप्रश्न –** *अहो, पण मला रहस्य हवं आहे, सर... किंवा एखादा फॉर्म्युला, एखादी मेथड सांगा ना!*

–रहस्य असं काही सांगता येणार नाही, पण लॅटरल थिंकिंग. आपण गणिताची घोकंपट्टी करतो. त्यात अर्थ नाही. गणितातलं सौंदर्य शोधणं गरजेचं आहे.

यावर डॉ. काकोडकर यांनी पुस्ती जोडली की, Maths is multinational language. अच्युत गोडबोलेंच्या भाषाप्रभुत्त्वाचं हेच रहस्य असेल.

**स्वरांश दीक्षित** - *तुम्ही सामील झालेल्या आदिवासी चळवळीने तुम्हांला नेमकं काय दिलं?*

–दोन-तीन गोष्टी दिल्या. एक म्हणजे सामान्य माणूस कसा जगतो, हे लक्षात आलं. विशेष म्हणजे भारतातल्या शेतीमधली, खेड्यांमधली परिस्थिती कशी आहे, हे मला फार जवळून बघायला मिळालं. त्यातलं exploitation म्हणजे काय, सावकार आणि जमीनदार जमिनी कसे हिसकावून घ्यायचे, हे सगळं बघायला मिळालं. त्याचबरोबर तिथलं लोकल राजकारण कसं असतं, हे पाहता आलं. माझ्या लिमिटेशन्स लक्षात आल्या. मारामाऱ्या केल्या, धमक्या यायच्या, जेलमध्ये गेलो... पण आपण हे कायम जगू शकणार नाही, हा साक्षात्कार झाला. आयुष्याची दाहकता लक्षात आली. माणसांचे वेगवेगळे स्वभाव, ठिकाणं, त्यातलं निसर्गसौंदर्य, वेगवेगळ्या वृत्ती... अशा अनेक गोष्टी पाहायला मिळाल्या. CEO झालो, जगभर फिरलो, पण ते अनुभव आणि शिकवण आयुष्यभर सोबतीला राहिली.

**सुधीर गाडगीळ –** *तुमचं बालपण सगळं गेलंय सोलापुरात. सोलापुरातलं बालपण कसं होतं?*

–त्यावेळेला अनेक खेळ खेळले जात. विशेष म्हणजे बुद्धिबळ खेळला जात होता. सोलापूर गाव तसं विचित्र आहे. सोलापूर आणि बुद्धिबळ हाच एक विनोद आहे. त्यापेक्षा पुढची गोष्ट म्हणजे पहिल्यांदा बुद्धीने सुरुवात करून नाही जमलं तर मग बळ आहेच. कारण तिथे पहेलवान बरेच होते. मी फुटबॉलही खेळायचो. गाण्याची आवड श्रीराम पुजारींमुळे लागली. आमच्या घरी पंडित भीमसेन, कुमार गंधर्व, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर अशी मोठी माणसं यायची. घरी काव्यवाचनं व्हायची. आजकालच्या मुलांना विचारलं की काय होणार, तर या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात अमुक अमुक व्हायला आवडेल... अशी ठरावीकच उत्तरं असतात. परंतु संगीत, साहित्य, चित्रकला हे प्रांत विज्ञान-तंत्रज्ञानाइतकेच महत्त्वाचे आहेत, हे लहानपणापासून आमच्या मनावर बिंबलं. हे कोणी शिकवलं नाही, तर ते घडत होतं समोर. इंजिनिअर, डॉक्टर यांच्याएवढेच मला कलाकार महत्त्वाचे वाटतात. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला एक IQ टेस्ट झाली होती, मोठ्या कलाकरांची, वैज्ञानिकांची, आणि इंजिनिअर्सची. त्यात कलाकारांचा IQ जास्त ठरला होता. अच्युत गोडबोले यांनी 'वयम्'ला मनमुराद शुभेच्छा दिल्या आणि या रंगलेल्या गप्पांचा शेवट झाला.

**–वयम् प्रतिनिधी**





# मनमोहक कासपठार



कंगवा

**पावसाळ्यात पश्चिम** घाटातील प्रत्येक डोंगर-दरी -पठाराला 'हिरवे हिरवे गार गालिचे, हरित तृणांच्या मखमालीचे' हे बालकवींनी केलेलं सृष्टीचं वर्णन लागू पडतं. दोन वर्षांपूर्वी आम्ही अशाच एका पठाराला भेट दिली. ह्या पठाराचं नाव आहे 'कास पठार'. याला हे नाव कसं पडलं, याबद्दल निश्चित माहिती नाही. पण पूर्वी इथे 'कास' या नावाची फुलं (एलिओकौर्प्स - सिरॅटस-ओब्लॉग्स) सापडत असत. ह्या वनस्पतीवरून हे नाव पडलं असावं. आदिवासी भाषेत 'कास' म्हणजेच तलाव. इथे मोठे तलाव आहेत, म्हणूनही याचं नाव 'कास' पडलं असावं. या तलावाच्या व पठाराच्या भोवती सच्छिद्र जांभा दगड असल्याने त्यावर वस्ती, शेती होत नाही. परंतु पावसाळ्यात म्हणजेच श्रावणात ऊन-पावसाचा खेळ सुरू झाला की पायाच्या घोट्याच्या उंचीइतकी इंद्रधनुष्याच्या रंगांची फुलं फुलतात. असं वाटतं की पृथ्वीवर कुणीतरी नक्षीदार गालिचाच पसरला आहे.

सातारा शहरापासून बारा कि.मी. अंतरावर हे पठार आहे. हा संपूर्ण प्रदेश सदाहरित जंगल प्रदेश आहे. आजूबाजूला अनेक किल्ले आहेत. चाळकेवाडी येथे पवनचक्क्या आहेत, ठोसेघरसारखे अनेक धबधबे आहेत. कास तलावातून सातारा शहराला गेली दीडशे वर्ष अव्याहत, कोणत्याही कृत्रिम ऊर्जेचा वपर न करता गुरुत्वाकर्षणाने (म्हणजेच तीन ठिकाणी 'सायफन' पद्धतीने) पाणी पुरवलं जात आहे. या परिसरात २०००ते २५०० मि.मी. पाऊस पडतो. त्यामुळे हा 'सडा' (पठार) ओला राहतो. ह्या पठारावर बोचरा वारा, कडाक्याची थंडी, डोंगरावरून उतरणारं धुकं, रिमझिम पाऊस यामुळे फुलांवर जणू कोणी दवबिंदूच्या रूपात मोत्यांची उधळणच केली आहे, असं वाटतं. गणेशोत्सवाच्या दिवसात ह्या पठारावर वेगवेगळ्या वेळेस वेगवेगळी फुलं फुलतात. साधारण जून महिना संपत नाही, तर हबे आमरीचे पांढरे कोंब उगवतात, अधूनमधून 'वायतुरे' वनस्पती डोकावू लागते. हिलाच 'ॲपोनोजेटान सातारेन्सिस' असं म्हणतात, कारण ती फक्त इथेच सापडते. मग पिवळी सोनकी हळूच डोकावते. स्मिथियाची फुलं (म्हणजे 'मिकीमाऊस') अगदी जवळून पाहताना ती जणू डोळे मिचकावत आहेत, असं वाटतं.

तेरडा द्वारपालासारखा हात जोडून सर्व देवतांचं पृथ्वीवर स्वागत करत असतो. अधेमधे बुके, गेंद या फुलांचे ताटवे आढळतात. दहा प्रकारच्या आमरी आहेत. दोपत्री, सीतेची आसवं यांनी आपली हजेरी एव्हाना लावलेली असते. फांदीच्या एकाच बाजूला सगळी फुलं फुलल्यामुळे कंगवा आमरी तर अक्षरशः कंगव्यासारखी दिसते.



कोमल, शेपूट, तुतारी, कंदील पुष्प निचुर्डी, गौरिहर, रानहळद, तुरे आभाळी, नभाळी, सापकांदा, नागफणी, हत्तीची सोंड, ड्रॉसेरा असे छोट्याछोट्या फुलांचे





सोनकी

अनेक सुंदर प्रकार आहेत. दर सात वर्षांनी फुलणारी निळी कारवी हे सुद्धा या पठाराचं वैशिष्ट्य आहे. ड्रॉसेरा ही कीटकभक्षक वनस्पती. अगदी चिमुकली. ती बघायला भिंग वापरावं लागतं.

या पठारावर एक तळं आहे. त्यात कुमुदिनीची (निम्फॉइडस इंडिकमची) कमळं सारं तळं झाकून टाकतात. या कमळांचे एक वैशिष्ट्य आहे; ती पानांपासून वेगळी तोडली तर तिचे निर्माल्यात रूपांतर होते. या पठारावर एकूण ३८ जातींची फुले आढळतात, या तलावाच्या एका बाजूला सुंदर घळई निर्माण झाली आहे. त्या रस्त्यावर 'गाभुळी'च्या वेली दिसतात. गाभुळी म्हणजे माशांच्या अंड्यांचा पुंजका. अगदी त्याच्यासारख्याच दिसणाऱ्या, मोहरीसारख्या हिरव्या दाण्यांचे द्राक्षाच्या घडासारखे घोस वेलींवर लटकलेले दिसतात. हरितालिकेच्या दिवशी ही अतिशय चविष्ट भाजी बाजारात येते. उत्तरांचलमधल्या 'व्हॅली ऑफ फ्लॉवर्स'सारखं आपल्या महाराष्ट्रातलं 'प्लॅटो ऑफ फ्लॉवर्स'!

युनेस्कोने 'जागतिक वारसा' म्हणून नोंदवलं गेल्यापासून कोयना-कास परिसराकडे सर्वांचं लक्ष गेलं आहे. अशी जैवविविधता असलेल्या जागेला दृष्ट लागली नाही तरच नवल! आता या जागेवर चहूबाजूंनी आक्रमण सुरू झालं आहे. पर्यटन, हॉटेल्सची गर्दी, गुरेचराई, वाढत्या पर्यटनामुळे गाड्यांची वाढती वर्दळ (आणि त्यामुळे वाढतं प्रदूषण) यामुळे या परिसरातले पक्षी, सरपटणारे प्राणी, परागीभवन करणारे कीटक आणि फुलांच्या विविध जाती यांची संख्या खूपच कमी होत आहे.

या पठाराचं संरक्षण-संवर्धन करण्यासाठी ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ, वनस्पती अभ्यासक आणि निसर्गप्रेमी नागरिक यांनी एकत्र येऊन 'रानवाटा' या नावाची संस्था स्थापन केली आहे. कासच्या संरक्षणासाठी रानवाटाचे स्वयंसेवक आणि वन कर्मचारी अविरत प्रयत्न करत आहेत.

हे अत्यंत वेगळं सृष्टिसौंदर्य बघायला तुम्ही कासला जरूर भेट द्या. मात्र तिथे गेल्यावर काही गोष्टी कटाक्षाने पाळायला हव्या, हे लक्षात ठेवा. तिथली नाजूक फुलं तोडणं, रोपं तोडून घरी नेणं, फुलांबरोबर स्वत:चे फोटो काढणं (फोटो काढायला त्यांच्यापर्यंत जाण्यासाठी अनेक फुलांना तुडवणं), प्लास्टिकचा आणि इतर कचरा इकडेतिकडे फेकून देणं, वेगाने गाडी चालवणं हे टाळलं पाहिजे. पठारावरील गवतातून चालू नये, कारण सरपटणाऱ्या प्राण्यांचा वावर तिथे असतो. आणि असं केल्याने रानफुलांना हानी पोहोचते. रेनकोट, छत्री, जास्तीचे कपडे, उबदार कपडे बरोबर न्यावेत. धुक्यातून एक-दोघांनी फिरू नये, कारण रस्ता चुकण्याची भीती असते, बरोबर बॅटरी असावी. तिथल्या स्वयंसेवकांना, वन-कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे.

आपल्या या अत्यंत सुंदर आणि वैशिष्ट्यपूर्ण पठाराचं संरक्षण करणं, ही आता आपल्या सर्वांचीच जबाबदारी आहे.

**-मोक्षदा नूलकर**

*mokshada_2007@rediffmail.com*



## INTRODUCTION

*Gumbow is a young elephant born with a special power. As he grows in the Jumbow Jungle, he develops many new powers to resolve the problems of the Jungle and its habitants. His intelligence is based on the concept that all knowledge is embedded in every brain. Gumbow brings it out by searching deep into his mind. Gumbow has many friends and we will introduce them as the adventures happen.*

*Timbow , the mouse, is the first friend of Gumbow in the Jungle. Quick and inquisitive, he is great help to Gumbow in their adventures.*

*Gumbow also has Mumbow the Monkey, Lumbow the Girraffe, Bearbow the Bear and Yaksha the mythological character actually appearing in the Jumbow Jungle. Gumbow will keep gaining friends as he goes about life in jungle.*

*The adventures happen mainly in the Jumbow Jungle but Gumbow and his friends have access to far flung cosmic areas that extend to other Galaxies. Gumbow will take all of us to such places with his ability to understand the science behind it.*

*'Wayam' brings you new & fresh 'Jumbow Jungle Stories' every month.*




# Gumbow & Hand-shakes

मुलांनो, सोप्या इंग्रजी भाषेतील ही इंटरेस्टिंग कथा-मालिका नक्की वाचा. त्यातल्या प्रश्नावर विचार करून उत्तर पाठवा. उत्तर मराठी, इंग्रजी कोणत्याही भाषेत चालेल.

**The Yaksha** was so pleased that he could not keep the secret of his meeting with the baby elephant Gumbow and his little friend, the mouse named Timbow. Yaksha told the story to his friends. Eager to see the small marvel called Gumbow, all of them decided to invite Gumbow and Timbow for a dinner.

Yaksha's place was far away and as Timbow said 'Beyond the Blue Sky'. The Yaksha planet was different in many ways. Gumbow and



Timbow tried with many things lying around in the Yaksha garden and found that they behave differently than same things on mother Earth.

"Gumbow , these are different things … may be… though they look as same what we have on Mother Earth …" said Timbow.

"Well well … I think the things are same but the operating forces and their rules are different here on the Yaksha planet … but we talk about it later as our hosts are already coming towards us…" Gumbow replied looking at the hosts of Yaksha's approaching them.

A total of 13 Yakshas and Gumbow and Timbow were at the sumptuous dinner at the Castle de Yaksha.

Before sitting down each of them shook hands with the other. As they were about to sit for the dinner the Guru of the Yaksha's appeared.



Seeing the handshakes around, the Guru Yaksha asked " Oh! You just had 'shake-hands' with each other. How many total 'shake-hands' did all of you together had? The one who answers this correctly and quickly will be blessed with a new power!"

Gumbow just smiled and went to the Guru Yaksha, bowed to him and said:

"A total of - - - hand-shakes, Sir"

" Gumbow you are right! Your math's power is amazing. Can you give your Yaksha friends the secret of this power?" said the Guru.

"There is no secret! If one tries to look deep into his mind all such powers are revealed to him. The tacit knowledge embedded in our brains become available." Said Gumbow, bowing himself infront of the Guru Yaksha.

"I bless you with the power of 'REDUCTION'. I am sure you will find it very interesting. Next time we meet, we can play with this power and solve some math with square root issues."



The Guru Yaksha opened his Golden hand and blessed Gumbow.

So, how many hand-shakes and How did Dumbow calculate?

**-Pradeep Deshpande**

*pradeep13754@gmail.com*

**Answer of last month's question :-**

Y =Yaksha's age / S = Son's Age / F= Father's Age

A) Y= 3S (S being son's age and Yaksha is 3 times the age of his son)

B) 2Y+40 = F (F being Father's age and father is twice +40 yrs of Yaksha)

C) Y+S+F = 1240

Y = 1240 - (S + F)

Y = 1240 - (Y/3+2Y+40)

Y+Y/3+(2Y+40) = 1240

4/3Y+2Y+40= 10/3Y+40=1240

10/3Y=1200

(1200/10) 3 = Y

120 x 3 = Y = 360 years

360 = Years … The age of the Yaksha!

This is 3 times the age of Yaksha's son i.e. 120 years is the age of the son.


Twice of Yaksha's age + 40 years = fathers age = 360 x 2+40 = 760 years.


Total age of Yaksha + son + father = 360 + 120 + 760 = 1240.

Write back to Wayam with your photograph. Your answer will appear in Wayam with your photograph. The correct answers would be published in the next issue of Wayam.

# घरच्या घरी कला-खेळ!

**पावसाळ्याचे** दिवस आहेत. पाऊस सुरू असताना आई बाहेर सोडत नाही, कारण भिजायला होईल आणि पावसाने थोडा वेळ विश्रांती घेतली तरी पाणी आणि चिखलामध्ये नेहमीचे खेळ नाही खेळू शकत. अशा वेळी घरच्या घरी वेळ घालवायला ओरिगामी आपल्या मदतीला येऊ शकते. ओरिगामी म्हणजे कागदाच्या घड्या घालून त्यापासून सुंदर वस्तू बनवायची जपानी कला. इंटरनेटवर ओरिगामी शिकवणाऱ्या शेकडो वेबसाइटस् आहेत. यातलीच एक चांगली वेबसाइट म्हणजे http://www.en.origamiclub.com/ या साइटवर ओरिगामीच्या सोप्या वस्तू वेगवेगळ्या विभागांमध्ये दिलेल्या आहेत. उडी मारणारा बेडूक, पंख हलवणारा पक्षी, गोल फिरणारा भोवरा वगैरे मजेशीर गोष्टी, तुम्ही अगदी सहज बनवू शकता. जर घरामध्ये ओरिगामीसाठी लागणारे कागद नसतील तर साध्या वर्तमानपत्रापासून बनवता येणाऱ्या वेगवेगळ्या टोप्या किंवा खोके यांचापण एक विभाग इथे आहे.









## बुकमार्क्स

**घरच्या घरी** टाकाऊ वस्तूंपासून छान, मजेदार खेळणी बनवता आली तर? आणि त्या खेळण्यांमधून सोपी वैज्ञानिक माहिती मिळाली तर? अशक्य वाटणारी ही गोष्ट साध्य केली आहे अरविंद गुप्ता यांनी. अरविंद गुप्ता हे आय.आय.टी. कानपूर येथे शिकले आहेत. गलेलठ्ठ पगारची परदेशी नोकरी त्यांना सहज मिळाली असती. पण महात्मा गांधींचा प्रभाव असलेल्या गुप्तांनी "Toys from Trash" या सूत्राचा वापर करून शेकडो खेळणी बनवली आहेत. साध्या काडेपेटीच्या काड्या आणि सायकलची व्हाल्व ट्यूब यांचा वापर करून निरनिराळ्या भौमितिक रचना करणे किंवा घरगुती वस्तूंपासून पंप बनवणे इत्यादी. आणि या सगळ्यामागच्या वैज्ञानिक सूत्रांची माहिती करून घ्यायची असेल तर http://www.arvindguptatoys.com/toys.html इथे भेट द्या. तुमच्या शालेय प्रकल्पांसाठी खूप महत्त्वपूर्ण माहिती तुम्हांला इथे मिळू शकते. याच साइटवरून तुम्ही गुप्तांची वेगवेगळ्या विषयांवरची शेकडो पुस्तकेदेखील डाउनलोड करू शकता. ही वेबसाइट म्हणजे ज्ञान आणि मनोरंजनाचा एक मोठ्ठा खजिना आहे. सर्वांसाठी मोफत उपलब्ध असलेल्या या माहितीने तुम्हा सर्वांचे आयुष्य समृद्ध होवो, ही सदिच्छा!

**–असीम राणे**
*aseemrane@gmail.com*

नक्की वाचा!

# गोष्ट मार्क इंग्लिसची




'मार्क इंग्लिस हा माणूस एव्हरेस्टवर चढला त्याची गोष्ट' हे पुस्तक म्हणजे मार्क इंग्लिसचे संपूर्ण जीवन-चरित्र आहे. या पुस्तकात त्याने प्रत्येक संकटाला कशाप्रकारे तोंड दिले व आपले नाव कसे सार्थ केले, याचे वर्णन आहे. त्याचा हा थोडक्यात सारांश-

**न्यूझीलंड** येथील ख्राइस्टचर्च येथे राहणारा मार्क हा अतिशय जिद्दी होता. लहानपणापासून त्याला गिर्यारोहण व सायकलिंगची आवड होती.

थोडे मोठे झाल्यावर ते छंद जोपासण्यासाठी न्यूझीलंडमधील छोट्या डोंगर टेकड्यांवर चढाई करीत. उदरनिर्वाहासाठी ते 'माउंट कूक' या पर्वतावर संरक्षक म्हणून काम करत. याच वेळी ते 'माउंट कूक' सर करण्यास 'फील' सोबत गेले. १४ दिवसांच्या तीव्र वादळाने या दोघांना माउंट कूकच्या मध्यावर अडकवले. १४ दिवस ते बर्फात होते.

छोटा शेफ

## खट्टी- मिठी इमली गोळी



**साहित्य**- बिया काढलेली सुकी चिंच ५० ग्रॅम, चार टी स्पून किसलेला गूळ, चवीपुरतं मीठ, अर्धा चमचा लाल तिखट, पाणी, साखर.

**कृती**- प्रथम बिया काढलेली चिंच थोडंसं पाणी टाकून मळून घ्या. त्यात किसलेला गूळ, मीठ, तिखट घाला आणि परत थोडंसं पाणी टाकून मिश्रण मळून घ्या. आता या गोळ्यापासून छोट्या छोट्या, आवडणाऱ्या आकाराच्या गोळ्या करा. ह्या गोळ्या साखरेत घोळवा आणि सर्व्ह करा.

**टीप**- इमली गोळी घट्ट हवी असेल तर फ्रीजमध्ये एक तास ठेवावी.

जवळ फक्त एक बिस्कीट-पुडा. अति थंड हवामान आणि अन्नाचा अभाव याचा परिणाम म्हणजे त्यांचे गुडघ्याखालचे दोन्ही पाय कापण्यात आले. पण तरीही न घाबरता पुन्हा जवळजवळ १८ वर्षांनी पुन्हा त्यांनी 'माउंट कूक' सर केले. जिथे गमावले तिथेच कमावले. २० सप्टेंबर २००० रोजी झालेल्या सिडनी पॅरॉलिम्पिक मध्ये त्यांनी सायकलिंग स्पर्धेत रौप्यपदक पटकावले. नोकरीसाठी मोंटाना मार्लबरो या वाइन तयार करण्याच्या कंपनीत संशोधक म्हणून कामाला लागले. त्यांनी तयार केलेल्या वाइनला जागतिक पातळीवर पुरस्कार मिळाला. ४७ वर्षीय मार्क १५ मे २००६ रोजी सकाळी सात वाजता माउंट एव्हरेस्ट वर उभे राहिले. जिद्द आणि चिकाटीच्याा जोरावर त्यांनी आपले ध्येय गाठले. हे शिखर सर करणारे ते पहिले अपंग व्यक्ती ठरले. तेव्हापासून आजपर्यंत ते व त्याची पत्नी ॲनी अपंगासाठी काम करत आहेत. त्यांनी मिळून 'लिंब्जे फॉर ऑल' ही संस्था स्थापन केली. ही संस्था अपंग व हिमालयातील शेर्पा मंडळी व त्यांच्या कुटुंबासाठी काम करते आहे.

मार्क इंग्लिस यांनी 'पीक एफ्यूल' नावाचा एक पदार्थ गिर्यारोहकांसाठी तयार केला आहे. हे 'पीक एफ्यूल' पातळ, पौष्टिक व चविष्ट आहे. गिर्यारोहकांना हा पदार्थ फार उपयोगी पडतो. झटपट ऊर्जा मिळवण्यासाठी ते याचा उपयोग करतात. मार्कचे हे त्यांच्यासाठी ठरलेले वरदानच म्हणावे.

लक्ष्य गाठण्याची तीव्र इच्छा, जखमांचा त्रास सहन करण्याची सहज शक्ती, प्रचंड जिद्द, उत्तम मानसिकता, शारीरिक साथ नसताना प्रत्येक संकटाला तोंड देण्याची क्षमता, आर्थिक साहाय्य नाही म्हणून जागीच न थांबण्याची वृत्ती, सतत पुढे जाण्याचा विचार, अपंगत्व आले तरी जगण्याची उमेद नष्ट न करणारा, समाजास मोठे योगदान देणारा हा मार्क इंग्लिस!

माणसात जिद्द व जगण्याची उमेद निर्माण करणारे हे पुस्तक, लेखक डॉ. संदीप श्रोत्री यांनी अतिशय सोप्या भाषेत व उत्तमरीत्या लिहिले आहे. या पुस्तकात आपण इतके रंगून जातो की, गंभीर प्रसंगात आपणही गंभीर होतो. हे पुस्तक मला जसे आवडले तसे तुम्हांलाही नक्की आवडेल.

**-पार्थ वैजापूरकर**

*इ. ८वी. आनंद निकेतन, नाशिक.*

*मार्क इंग्लिस : लेखक -डॉ.संदीप श्रोत्री, राजहंस प्रकाशन.*

# दाण्याच्या कुटाच्या वड्या

**साहित्य**- दाण्याचं कूट तीन वाट्या, किसलेला गूळ अर्धी वाटी, तूप पाव वाटी, चवीपुरती वेलचीपूड, शेंगदाणे.

**कृती**- प्रथम दाण्याचं कूट घ्या. त्यात किसलेला गूळ घालून मिश्रण मळून घ्या. नंतर त्याचा मऊ गोळा होण्यासाठी दोन-तीन छोटे चमचे तूप, वेलचीपूड घाला आणि मिश्रण पुन्हा मळून घ्या. आता प्लास्टिक पिशवीला तूप लावून घ्या आणि मिश्रणाचा गोळा थापटून पसरवा. सुरीने आवडणाऱ्या आकाराच्या वड्या पाडून घ्या. त्यावर शोभेसाठी शेंगदाणा मध्ये चिकटवा. नंतर ह्या वड्या दोन तास फ्रीजमध्ये ठेवा. दोन तासांनंतर दाण्याच्या कुटाच्या वड्या खाण्यासाठी तयार.

**-शुभदा गोडबोले**


जीनियस
अशोक

**विहानची** सुट्टी संपली. शाळा सुरू झाली. आजी-आजोबांच्या गावाच्या छान-छान आठवणी घेऊन विहान शाळेच्या दिनक्रमात बुडून गेला. शाळेत सध्या विज्ञान प्रदर्शनाचे वारे वाहत होते. विहानला विज्ञानाची खूपच आवड. त्यानेही या प्रदर्शनात भाग घेतला होता. बॅटरीवर चालणारा छोटा रोबो त्यानं बनवला होता. सगळ्यांना त्याचं ते संशोधन खूपच आवडलं. विहानच्या या उपक्रमाला आंतरशालेय विज्ञान प्रदर्शनाच्या स्पर्धेत पहिला नंबर मिळाला. विहानचं शाळेतही खूप कौतुक झालं. बक्षिसाची ट्रॉफी घेऊन तो नाचतच घरी आला. घरी आल्यावर त्यानं ती ट्रॉफी सगळ्यांना दाखवली. आई, बाबा, शेजारचे अंकल सगळ्यांनी खूपच कौतुक केलं. बाबांनी या यशाबद्दल त्याला खरा रोबो घेऊन देण्याचं प्रॉमिस केलं. तर आईनं त्याचं हे यश सेलिब्रेट करण्यासाठी रविवारी त्याच्या ग्रुपमधल्या मित्रांना बोलावून पावभाजी आणि आइसक्रीमचा बेत पक्का केला. त्या दिवशी विहान तर हवेतच तरंगत होता. या सगळ्या कौतुकात त्याला त्याच्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी केलेलं कौतुक फार आवडलं होतं. सर म्हणाले होते, ''विहान हा एक मोठा संशोधक होईल आणि आपल्या शाळेचं आणि देशाचं नावं उज्ज्वल करेल असा मला विश्वास आहे!'' विहानला सरांची ती शाबासकी खूपच आवडली होती. रात्री तो निजला तेव्हाही आपण मोठे संशोधक झालोय, 'नासा'मध्ये काम करतोय, असं स्वप्न त्याला पडत होतं.

सकाळी विहान जरा उशिराच उठला. आज रविवार होता. शाळेला सुट्टी होती. विहानला जाग आली आणि त्याला रात्रीचं स्वप्न आठवलं. तो एकदम खुशीत आला. स्वयंपाकघरात आई ओट्याजवळ काहीतरी करत होती. त्यानं मागून आईला मिठी मारली. 'उठलं का माझं बाळ?' म्हणत आईनं त्याला कुरवाळलं. 'चला, ब्रश करून या! आज साबुदाण्याची मस्त खिचडी केलीय. ये पटकन!' 'काय उठले का सायंटिस्ट?' म्हणत बाबांनी विहानचं कौतुक केलं. ब्रश करून आपली आवडती खिचडी दोनदा खाऊन, दूध पिऊन आज संध्याकाळी कुणाकुणाला बोलवायचं याची यादी विहान करत बसला होता. तोच आई म्हणाली, ''विहान, अरे, अशोकलाही बोलाव. आपल्या छायाताईचा मुलगा! त्यालाही असलं काहीतरी करण्याची आवड आहे!'' विहानला आईचा राग आला. ''शी आई ! अगं, माझे सगळे इंग्लिश मीडियमचे मित्र येणार, त्यांच्यात तो अशोक कशाला?' मी नाही बोलावणार त्याला!''

आई काहीच बोलली नाही. नेहमीप्रमाणं दहा वाजता छायाताई कामाला आल्या. आल्यावर विहाननं त्यांना आपली ट्रॉफी दाखवली. ट्रॉफी बघून विहानची अलाबला घेत छायाताई म्हणाल्या, ''लई बेस हाय हे बक्षीस! पण विहानबाबा हे तुम्हांला कुठं मिळलं? माझा अशोक बी असलं काय काय लई करत असतो. त्याच्यापन शाळेत आता न्यान प्रदर्शन का काय हाय म्हणं ! त्याला पण बक्षीस मिळलं असं त्याचे गुरुजी म्हणत होते!''

छायाताईचं बोलणं ऐकून विहानला रागच आला. 'आधी आई आणि आता छायाताई! काय तर म्हणे, त्यांचा अशोकपण असलं काय तरी करत असतो म्हणे. हं! कुठं माझं हे रोबोचं संशोधन आणि कुठं त्या अशोकनं बनवलेलं काहीतरी फडतूस! सगळीकडचा कचरा जमा करून काहीतरी जोडत असेल झालं!'

विहान पुटपुटला. ते आईनं ऐकलं. ती म्हणाली,

''विहान, आपण असं करूया, आता छायाताईचं काम होतच आलंय. त्यांचं घर जवळच आहे. आपण त्याच्या घरीच जाऊ आणि पाहू अशोक काय करतोय ते! चालेल?''

आईनं बहुतेक मुद्दाम विचारलं, विहानच्या ते लक्षात आलं. तो लगेच म्हणाला, ''चालेल! जाऊया आपण! मला ही बघायचंय तो अशोक काय काय करतोय ते.''

छायाताईंनी हे ऐकलं, त्यांना खूप आनंद झाला. त्यांनी लगबगीनं काम आवरलं. तिघांनी रिक्षा केली. आणि छायाताईंच्या घरी आले. तो एरिया तसा झोपडपट्टीचाच होता. दारातून गटारं वाहत होती. घाणेरडे कपडे घातलेली, काही तर उघडी-नागडी मुलं इकडून तिकडं हिंडत होती. विहानला घाण वाटली. कसलातरी कुबट वास सगळीकडं पसरला होता. विहानने नाकावर हात ठेवला. त्या कचऱ्यातून वाट काढत छायाताई त्यांना घेऊन जात होती. अखेर तिचं घर आलं. विहाननं पाहिलं तिचं घर. घरापुढचं अंगण स्वच्छ होतं. अंगणात कुठेही कचरा नव्हता. दाराला छान पडदा लावलेला होता.

छायाताईनं या दोघांचं स्वागत केलं. आतलं घरही स्वच्छ आवरलेलं होतं. एक कॉट होती. कोपऱ्यात छोटासा ओटा होता. कॉटच्या कडेला एक टेबल-खुर्ची होती. त्या टेबलावरच फळी मारून छोटा टीव्ही ठेवलेला होता. अशोक-छायाताईंचा मुलगा त्या खुर्चीवर बसला होता. त्या खुर्चीच्या सभोवती मोडकं-तोडकं, धडकं सामान पडलं होतं. टेबलावर काही सामान पडलं होतं. कोपऱ्यात एक मोडकी सायकल होती. त्याला कसल्या कसल्या वायरी जोडल्या होत्या.

छायाताई पुढं झाली आणि तिने अशोकला हाक मारली. ''अशोक, बघ तरी कोण आलंय! विहानबाबा आणि वहिनी आल्यात. अरे, विहानबाबाला बक्षीस मिळालं ना? मी म्हटलं, आमचा अशोकपण काहीतरी करतो असलंच! म्हणून ते बघायला आले आहेत.''

आईचं बोलणं ऐकून अशोक धडपडत खुर्चीतून उतरला. विहाननं पाहिलं, त्याचे दोन्ही पाय काडीसारखे होते. कुबडीच्या आधारानं तो उभा राहिला. कुबडी खांद्यात धरून त्यानं नमस्कार केला. विहानला आश्चर्य वाटलं. 'हा पांगळा मुलगा आणि हा माझ्यासारखे काहीतरी प्रयोग करतो असं छायाताईंनी म्हणावं? आणि आईनंही त्याला दुजोरा द्यावा!' विहानला त्या दोघींचा राग आला. त्याला तिथं थांबवेना.

''चल आई, जाऊया आपण!'' असं म्हणत तो जाण्यासाठी वळला. तोच, ''विहानबाबा, थांबा की जरा ! अशोक तुम्हांला दाखवेल त्यानं काय केलंय ते! दाखव रे अशोक!'' छायाताई म्हणाली.

''हो आई, दाखवतो!'' असं म्हणत अशोक पुन्हा त्याच्या चाकाच्या खुर्चीत चढून बसला. ''हे बघा विहानबाबा!'' असं म्हणत, एका हातानं विहानचा हात धरून दुसऱ्या हातानं खुर्चीचं चाक फिरवत, अशोक विहानला आतल्या खोलीत घेऊन गेला. बाहेरची खोली जितकी स्वच्छ होती, तितकीच आतली खोली पसरलेली होती. खिळे, मोळे, बॅटरीचे सेल, स्क्रू ड्रायव्हर, छोटीशी करवत, वायरीचे असंख्य तुकडे, कसले कसले पान्हे, हातोडा अशा अनेक वस्तू विखरून पडल्या होत्या.

''या विहानबाबा, ही बघा माझी मोडकीतोडकी प्रयोगशाळा.'' अशोक



म्हणाला. विहानला हसू आलं. या प्रकारच्या झोपडीतल्या गळक्या छपराच्या खोलीला तो प्रयोगशाळा म्हणत होता.

'नॉनसेन्स.' विहान पुटपुटला. तोच अशोक खुर्चीवरून उतरला. कुबडीच्या साहाय्यानं चार पावलं पुढं गेला. तिथं खाली वाकून त्यानं कसलंतरी एक उपकरण उचललं. त्यात एक पालथी वाटी होती. तिच्यावर दोन काटक्या लावल्या होत्या. दोन्ही बाजूनं रबरबँडनं त्या वाट्या आणि काटक्या दुसऱ्या एका फळीला जोडल्या होत्या. त्या फळीवर एक स्प्रिंग बसवली होती. त्या स्प्रिंगला एक दोरी बांधली होती. अशोकनं ती दोरी ओढली. त्याबरोबर त्या वाटीवर त्या काटक्या आपटायला लागल्या.



विहानला जरा कौतुक वाटलं. त्यानं विचारलं, ''हे काय ?'' अशोक म्हणाला, ''माझ्या आजीसाठी हे बनवलंय.'' अशोकनं सांगितलं.

विहान ते सगळं बघत होता. विहानच्या आईच्या डोळ्यांत कौतुक उमटलेलं होतं. तोच अशोक खुर्ची फिरवत एका मोडक्या सायकलजवळ आला. त्या सायकलला फक्त दोन चाकं आणि पायडल होतं. सीट नव्हती. हँडल अर्धच होतं. त्या मोडक्या सायकलला खूपशा वायरी जोडल्या होत्या. त्यातली एक वायर तर छतापर्यंत गेली होती. आणि त्या वायरच्या टोकाला एक बल्ब होता. अशोकनं खुर्ची त्या सायकलजवळ नेली आणि वाकून जोरदार पायडल फिरवलं बराच वेळ. आणि त्या सायकलच्या चाकाला जशी गती आली, तसा तो छताला लावलेला बल्ब फकफकत पेटला. ती अंधारी खोली प्रकाशानं उजळून निघाली. त्या चाकांना पुरेशी गती दिल्यावर अशोकनं खुर्ची मागे सरकवली. आणि विहानला म्हणाला, ''विहानबाबा, आपण कितीतरी ऊर्जा वाया घालवतो. आता या गतीज ऊर्जेमुळे हा बल्ब अर्धा तास पेटत राहील. हेच उपकरण मी आमच्या शाळेच्या विज्ञान प्रदर्शनात ठेवणार आहे !''

अशोक बोलत होता. पण विहानचं



लक्षच नव्हतं. तो डोळे विस्फारून एकदा फिरणाऱ्या चाकाकडं तर एकदा पेटलेल्या बल्बकडं पाहत होता. ती सायकल अगदीच मोडकी होती. तिची दोन चाकंच तेवढी काय ती शाबूत होती. दोन्ही पायडलं तुटलेली होती. त्याच्या मधल्या फळीला अशोकनं एक कांडी बसवली होती. त्या कांडीला एक रबरी नळी जोडली होती. ती नळी चांगली चार फूट लांब होती, अगदी बाहेरच्या खोलीपर्यंत, टेबलापर्यंत. तिथं बसून अभ्यास करता, करता, अशोक त्या सायकलच्या चाकांना गती देऊ शकत होता.

''कसं झालं उपकरण, विहानबाबा?'' अशोकच्या ह्या विचारण्यानं विहान भानावर आला. त्या मोडक्या सायकलच्या उपकरणाकडे तो डोळे विस्फारून बघत होता. 'कमाल आहे ह्या अशोकची! कचऱ्याच्या सामानातून त्यात गतीज ऊर्जा निर्माण केली आणि घरात वीज आणली. आणि आपल्याला सगळी साधनं, तीही नवी, सुस्थितीत हाताशी असताना, सगळ्यांचा पाठिंबा असताना आपण ते छोटंसं उपकरण बनवलं. याला पाय नाहीत. चांगली साधनं हाताशी नाहीत. आणि कुणाचं पाठबळ नाही, तरी यानं हे बनवलंय! आणि आपण याला तुच्छ लेखत होतो.'

विहानची मान शरमेने झुकली. त्यानं पुढं होऊन अशोकला मिठी मारली. विहानच्या डोळ्यांत पाणी होतं. ते न पुसताच तो अशोकला म्हणाला, ''अशोक, मला ते छोटंसं बक्षीस मिळालंय म्हणून घरी आज छोटीशी पार्टी ठेवली आहे. माझ्या यशाबरोबर तुला मिळणारं यश हे आपण आधी सेलिब्रेट करूया. कारण तुझा नंबर येणार हे नक्की. तेव्हा संध्याकाळी पार्टीला ये. छायाताई, त्याला तुमच्या सोबत घेऊन या!''

अशोकला असं अगत्याचं निमंत्रण देऊन विहान आईला म्हणाला, ''आई, चल घरी जाऊया!''

आईला विहानचं कौतुक वाटलं. छायाताईला आणि अशोकला येण्याचं पुन्हा पुन्हा सांगून आई विहानला घेऊन बाहेर पडली. वाटेत रिक्षात बसल्यावर तिनं विचारलं, ''विहान, तू अशोकला बोलावणार नव्हतास ना?''

विहानचे डोळे पाण्यानं भरले. म्हणाला, ''आई, ती माझी मोठी चूक होती. आता मित्रांच्या यादीत अशोकच नाव पाहिलं असणार. बिकॉज ही इज जीनियस ना?''

आईला आनंद झाला. विहानमधला फरक खरोखरच कौतुकास्पद होता. आईनं विहानला जवळ घेतलं, त्याच्या केसांतून हात फिरवला. ''शहाणं माझं बाळ ते!'' असं म्हणाली. विहानसाठी हे बक्षीस फार मोठं होतं. अगदी त्या ट्रॉफीपेक्षा !

**–मंजुश्री गोखले**

# कोडं

– 'वयम्' प्रतिनिधी

मुलांनो, जुलै अंकात तुम्ही पाऊस-पाणी या संबधीचं कोडं सोडवलं असेल ना! आता या कोड्यात निसर्गाशी संबंधित १५ शब्द (उभे-आडवे, सरळ-तिरपे) दिले आहेत. तर मग शोधा बरं हे शब्द.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| N | L | M | V | A | P | O | U | R |
| F | A | E | O | N | T | N | N | S |
| O | N | T | A | S | N | R | E | N |
| R | R | N | U | F | S | A | E | N |
| E | N | I | N | R | S | O | R | E |
| S | N | N | V | O | E | E | L | N |
| T | N | N | N | E | T | N | N | B |
| L | A | N | D | A | R | N | N | N |
| A | I | R | W | B | I | R | D | S |

# शब्दाशब्दी

गेल्या 'वयम्'मध्ये आपण सूर्यकिरणं काढायला दिली होती. काय मजा आली ना सूर्याला किरणं काढायला! पण खूप किरणांच्या सूर्यामुळे जर वातावरण गरम झालं असेल तर आपण आज शब्दांची दहीहंडी फोडून जरा गारवा आणूया.

आपण शाळेत बऱ्याचदा समानार्थी शब्द लिहितो, शिकतो. संस्कृत भाषेत अमरकोशात तर अशा हजारो शब्दांचे लाखो समानार्थी शब्द सूत्र-स्वरूपात दिलेले आहेत. आपणही खूप खूश असतो, तेव्हा आपल्या भावना योग्य तऱ्हेने ऐकणाऱ्यापर्यंत पोहोचण्यासाठी एकाच वेळी त्या अर्थाचे खूप शब्द वापरतो. उदा. ते बाळ काय गुंडू, गोंडुलं आहे ना? मग तुम्ही म्हणाल दहीहंडीची काय भानगड? तर एकाच अर्थाचे शब्द त्याच्या अक्षरसंख्येप्रमाणे वाढवत न्यायचे. हे उदाहरण बघा, म्हणजे समजेल.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वा | | | | |
| छा | न | | | |
| सुं | द | र | | |
| अ | प्र | ति | म | |
| न | य | न | र | म्य |

काय मग मुलांनो, किती थरांची पाठवताय शब्ददहीहंडी आम्हांला?

–कांचन जोशी
*kanchanpjoshi@yahoo.com*

# दुकानदारीचा अनुभव

**नफा, तोटा,** खरेदी, विक्री, व्यापारी, ग्राहक हे गणिताच्या पुस्तकातील शब्द अनेकांना घाबरवून सोडत असतील. दुकानात जाऊन आपण ज्या किमतीला वस्तू खरेदी करतो ती म्हणे विक्री किंमत आणि यात कमिशन, सूट आली की गोंधळात भरच! पण ही सर्व उदाहरणे कागदावर सोडवण्यापेक्षा दुकानात जाऊन खरेदी-विक्रीचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला तर! तसंही तुम्ही आई बाबांबरोबर खरेदीला दुकानात जाता. ते दुकान जर चॉकलेट, बिस्कीट, आइसक्रीम, दाबेली यांचं असेल तर, 'आपण या दुकानाचे दुकानदार असतो तर किती मजा' ही कल्पना तुमच्याही मनात आली असेल. काहींनी तर मोठेपणी दुकानदार व्हायचे असेही ठरवले असेल. तुमची ही इच्छा काही प्रमाणात का होईना, आम्ही पूर्ण करतो.

दुकानदाराचा दिवस कसा असतो हे पाहण्यासाठी नाशिकच्या 'आनंद निकेतन' शाळेत, दरवर्षी सातवीच्या मुलांना दोन दिवस शाळेला बुट्टी मारून दुकानात पाठवले जाते. स्टेशनरी, किराणा-माल, औषधे, बेकरी प्रॉडक्ट, दाबेली, मिठाई वगैरे विकताना वेगवेगळे दुकानदार, दुकानाची मांडणी, गिऱ्हाइके यांचे खूप मजेशीर अनुभव मुलांना येतात व ते त्यांनी लिहिलेल्या अहवालातही उतरवतात. गेल्यावर्षी मृण्मयी व अमेय दोन दिवस 'विजू'ज दाबेली' या हॉटेलमधे होते. त्यांनी केलेली मजा मृण्मयीच आपल्याला सांगते आहे :

''मी ज्या दुकानात गेले होते त्या दुकानाचे नाव 'विजू'ज दाबेली' आहे. ते हॉटेल आहे. तेथे दाबेली, सँडविच व सोडा मिळतो. पण ते दाबेलीसाठी खास प्रसिद्ध आहे. हे दुकान दोन मजली आहे. दोन मजल्यांवर टेबल व खुर्च्या आहेत आणि खाली दाबेलीची गाडी आहे. इथे कुठल्याही वेळेला लोक खायला येतात. जास्त करून तिथे कॉलेजच्या विद्यार्थ्यांची गर्दी असते. ते तिथे येऊन जोरजोरात गप्पा मारतात. मी तिथे बारा ते पाच या वेळात गेले होते. एकूण दोन दिवसांत



आम्ही विविध प्रकारची कामे केली. आम्ही कांदा सोलणे, लसूण सोलणे, मिरचीची देठं काढणे, दाबेली बनवणे, सँडविच बनवणे, टेबल साफ करून डिशेस उचलणे अशी खूप कामे केली. आम्ही पहिल्यांदा त्यांच्या किचनमध्ये गेलो तेव्हा वेगळेच वाटले. त्यांचे स्वयंपाकघर थोडे अस्वच्छ होते. तेथे वेगवेगळ्या भाज्यांची पोती ठेवली होती. भाज्या कापण्यासाठी तेथे एक ओटा होता. गेल्या-गेल्या त्यांनी आम्हांला दाबेली खायला दिली. त्यांनी आम्हांला वेगवेगळ्या प्रकारची सँडविचेस् बनवायला शिकवली. त्यामुळे घरीही आता मलाही वेगवेगळ्या प्रकारची सँडविचेस् करता येतील. जसे - चॉकलेट सँडविच, क्लब सँडविच, चीझ सँडविच.

'विजू'ज दाबेली' मध्ये एकूण दहा-बारा माणसं कामाला आहेत. दुकानातील मालक विजूकाका हे खूप वेळ दुकानावर नसतात. त्यांच्या अनुपस्थितीत संग्रामदादा काउंटरवर बसतो. त्याने आम्हांला कामे शिकवली. सगळेच काका आम्हांला आनंदाने शिकवत होते. त्यांचा स्वभाव मनमिळाऊ होता. ते खूप वेगाने काम करायचे. थोड्या-थोड्या वेळानंतर 'भूक लागली का?' याची चौकशी करायचे आणि खायचा आग्रह करायचे. ते म्हणायचे, ''हवं ते घ्या, अजिबात लाजू नका.'' त्यांचे व आमचेही दिवस छान गेले. दुकानात येणाऱ्या ग्राहकांना शाळेचे वेगळेपण आढळले.

मला एक अगदी गमतीशीर अनुभव आला. खेडेगावातून आलेल्या एका काकांनी मला दाबेली आणि चीझ म्हणजे काय असे विचारले. मी समजावून सांगितल्यावर त्यांनी दाबेली घेतली.

आम्ही त्या विजूकाकांची मुलाखत घेतली. त्यांनी त्यांच्या दुकानाबद्दल आम्हांला माहिती दिली. त्यांनी पैसे मिळविण्यासाठी स्वकष्टाने दाबेलीची गाडी लावली. एक वर्ष कुलकर्णी गार्डनच्या इथे गाडी लावून दाबेली विकली व १९९४मध्ये त्यांनी हे मोठे दुकान बांधले. त्यांची ही दाबेली आता नाशिकमध्ये लोकप्रिय झाली आहे. त्यांचे घर त्या दुकानाच्या वरच आहे, पण तेथील गजबजाटामुळे आता ते 'सिडीओ मेरी' येथे राहतात. सगळे नोकर दुसऱ्या मजल्यावरच झोपतात. विजूकाकांबरोबर त्यांच्या भाच्याचाही कामात सहभाग आहे. संगणकाच्या क्षेत्रात काम करू इच्छिणारे विजूकाका परिस्थितीमुळे दाबेलीच्या व्यवसायात शिरले. त्यांची ह्या व्यवसायात खूप प्रगती आणि भरभराट झाली.

ब्रेड, भाज्या, मसाले हा सगळा कच्चा माल नाशिवंत असल्याने ते जेव्हा लागतील तेव्हा मागवतात. कधी जर अन्न उरले तर तेथे राहणारे नोकर ते संपवून टाकतात. त्यांच्या हॉटेलच्या दारावर येणारे गरीब, भिकारी यांना मदत करताना आम्ही त्यांना पाहिले.

दोन दिवसांत त्यांनी आम्हांला आनंदाने सगळ्या गोष्टी शिकवल्या म्हणून, मी त्या सगळ्यांना सुरेखशी कागदी फुले भेटीदाखल दिली. दोन दिवस काम केल्यामुळे आम्ही नवीन गोष्टी शिकलो. कामाचे मोल कळले, वेगवेगळे अनुभव आले. पुढच्या  वर्षीच्या सातवीच्या वर्गाला नक्की या दुकानात पाठवावे.''

दुकानात मुलांनी विक्री केली, पुड्या बांधल्या, हिशेब केले, दुकानातील मालकाच्या व काम करणाऱ्यांच्या कौशल्याचं appreciation पण केलं. विभावरीने लिहिलं, 'त्या दुकानदार मावशी खूप छान होत्या. आमच्याकडून काही चुका होत होत्या. गिऱ्हाइकांना फाटक्या नोटा दिल्या



जायच्या. कधी वजन करताना कमी किंवा जास्त असं व्हायचं. पण मावशी सगळं सांभाळून घेत होत्या. त्यांनी आम्ही विचारलेल्या प्रश्नांची फार छान प्रकारे उत्तरं दिली. काही जास्तीची माहिती सांगितली.'

मुलांनी शाळेच्या वेळात म्हणजे साधारणपणे अकरा ते पाच या वेळात त्यांना नेमून दिलेल्या दुकानात जावं, अशी कल्पना होती. दुकानदारांशी तसं बोलणंही केलं होतं. यांतील काही शाळेचे पालक होते व त्यांनी या प्रकल्पाचा या पूर्वीही अनुभव घेतला होता. त्यामुळे मुलांना दुकानातील सर्व कामे करू देण्याची त्यांची तयारी होती.

स्वप्निल याच वेळात 'भारत बेकरीत' गेला होता. तेथे त्याला समजलं की, दुकानात जास्त गर्दी पाचनंतर होते, त्यामुळे दुपारनंतर पुन्हा एकदा जावं, असं त्यानेच ठरवलं. स्वप्निलमधला दुकानदार त्याच्याच शब्दांत–

'मी पाचला आलो. आता मला पदार्थांची नावं, किंमत, सील कसं करायचं, त्याचं प्रमाण, सगळं माहीत होतं. हळूहळू खूप गिऱ्हाईक यायला लागले. मग तर इतकी गर्दी वाढली की, गिऱ्हाइकांना उभं राहायलाही जागा नव्हती. मी एक पूर्ण गिऱ्हाईक सांभाळायचो. त्यांची ऑर्डर, किती पाहिजे, त्यांचे पैसे घेणे सगळे मीच करायचो. मला खूप मजा येत होती. आम्ही तिकडे केक कसा बनवतात तेही शिकलो. तिकडे जी मुलं काम करत होती, त्या सगळ्यांशी माझी खूप चांगल्या प्रकारे ओळख झाली होती. मला त्यांच्यासोबत खूप मजा आली. मी भरपूर विक्री केली. मला वेगळे काही अनुभवही आले. मुख्य म्हणजे कोणाकडे सुट्टे पैसे नसतात. त्यामुळे एक-दोन जणांना परतही पाठवावे लागले होते. मला तिथे खूप मजा आली. पुढच्या वर्षी जो मित्र भारत बेकरीवर जाईल, तो लकी ठरेल.'

दोन दिवसांचा मुलांबरोबरचा अनुभव दुकानदारांना कसा वाटला, मुलांनी दुकानातील कामात कसा भाग घेतला, याविषयीचा प्रतिसाद दुकानदारांनी लेखी द्यावा, यासाठी एक प्रश्नावली त्यांना देण्यात येते. ती भरून देताना त्यांनी शाळेच्या उपक्रमाचे, मुलांच्या मेहनतीचे खूप कौतुक केले. या दोन दिवसांत छोटी वस्तू घेऊन सुट्टे पैसे न देता मोठ्या नोटा देणारे, एखादं पेन घेण्यासाठी खूप पेनं काढायला लावणारे, वडा-सामोशाबरोबर वारंवार चटणी मागणारे अशा तऱ्हेचे ग्राहक मुलांनी अनुभवले. तुम्ही बालमजूर ठेवले आहेत का? असा प्रश्नही काहींनी विचारला. अशा वेळी काहींना मुलांनी तर काहींना दुकानदारांनी शाळेच्या या नावीन्यवपूर्ण उपक्रमाची माहिती दिली.

हा उपक्रम गेली दहा वर्षं शाळेत सुरू आहे. बिनभिंतीच्या शाळेतील हे दोन दिवस मुलांच्या दीर्घकाळ लक्षात राहतात. दरवर्षी सातवीच्या वर्गात नव्यानं येणारी मुलं उत्सुकतेनं या उपक्रमाची वाट बघतात.

**-शोभना भिडे**

*आनंद निकेतन, नाशिक*

shobhi.61@gmial.com

विनोद


# रावणाबद्दल नवीन माहिती

- रावण शाळेत असताना त्याला नेहमी मागल्या बाकावर बसवायचे.
- रावण १०-१० टोप्या घालायचा.
- एकाच वेळेला १० प्रकारच्या मुखशुद्धी पावडरीपण खायचा.
- लहानपणी रावणाच्या आईला त्याच्या नक्की कुठल्या तोंडात भडकावून द्यायची हा प्रश्न असायचा.
- कुठच्याही साध्या म्युझिक सिस्टिमवर गाणं लावलं तरी रावणाला ते डॉल्बी डिजिटल सराउंड साउंड ऐकू यायचं.
- रावण कधीच कुशीवर झोपू शकायचा नाही.
- रावणाला कधीच टी शर्ट घालता आला नाही.
- रावण एका तोंडाने पान खायचा व सर्व तोंडे लाल व्हायची. करण ती इंटरकनेक्टेड होती, अशी माहिती एका गाइडने सांगितली होती.
- रावण सलूनमध्ये गेला की, न्हाव्याला त्याचे काम दिवसभर पुरत असे.
- रावण एकटाच समूहगीत म्हणायचा.
- होळीला रावण एकटाच दहा वेगवेगळ्या स्टाइलनं बोंबलायचा.



- रावणाच्या लग्नात मंदोदरीच्या वडिलांनी १० हारांची ऑर्डर नोंदवली होती.
- रावणाला ढेकर आला की त्याला कुठल्या तोंडाने बाहेर काढावा हे समजत नसे.
- रावण एकटाच ग्रुप डिस्कशन करत असे...

1) Black काळा
2) Blue निळा




मुलांनो, तुमच्या लक्षात आलंय ना की, आपण दरवेळी तुम्हांला त्या त्या मोसमानुसार चित्र रंगवायला देत आहोत. यावेळी तुम्ही 'ग्रेट एगफ्लाय' नावाचे फुलपाखरू रंगवणार आहात. पंखांवरील निळ्या ठिपक्यांमुळे हे फुलपाखरू उठून दिसते. ऑगस्ट महिन्यात तुम्हांला तुमच्या आसपास कितीतरी प्रकारची फुलपाखरे दिसू लागतात. या महिन्यात हिरवाईत भटकायला जाताना किती प्रकारची फुलपाखरे दिसतील बघा!


**-जिल्पा निजसुरे**
*jilpa@krishivarada.in*




कल्पक, चौकस किशोरांचे मासिक

# वयम्

१ वर्ष ₹१९९/-

२ वर्ष ₹३४९/-

३ वर्ष ₹४४९/-

## सभासद व्हा!

| कालावधी | अंकाची संख्या | मूळ किंमत | देकार | सवलत % |
|---|---|---|---|---|
| १ वर्ष | १२ | ₹ ३००/- | ₹ १९९/- | ३३.६७% |
| २ वर्ष | २४ | ₹ ६००/- | ₹ ३४९/- | ४१.८३% |
| ३ वर्ष | ३६ | ₹ ९००/- | ₹ ४४९/- | ५०.११% |



नावः

पत्ता (संपूर्ण पत्ता खुणांसकट):

इमेल:

शाळा:

इयत्ता:

छंद:

जन्मतारीख:

'वयम्'कडून तुमच्या अपेक्षा:

संपर्क दूरध्वनी:

चेक/डिमांड ड्राफ्टः *लॅबइंडिया ॲनॅलिटीकल इन्स्ट्रुमेंट्स प्रा. लि. (Labindia Analytical Instruments Pvt. Ltd.)* या नावाने काढावा.

पत्रव्यवहाराचा पत्ता :

**'वयम्'**
न्यू वंदना को. ऑप. हाऊसिंग सोसायटी,
३रा मजला, लालबहादूर शास्त्री मार्ग
वंदना सिनेमाजवळ,
ठाणे ४०० ६०२

संपर्कासाठी दूरध्वनी :
**०२२-२५९८६२०२/३**

ई-मेल : info@wayam.in
वेबसाइट : www.wayam.in


संगीतकार श्रीधर फडके ह्यांनी संगीतबध्द केलेल्या व
श्रीमती आशा भोसले यांनी गायलेल्या गाण्यांची सीडी
सर्वत्र उपलब्ध
VSS
multimedia
प्रस्तुत
साकार गंधार हा
गायिका आशा भोसले
संगीत श्रीधर फडके

RNI No.MAHMUL03122/13/1/2013-TC

